


# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ६७ वा ❑ भारतीय सौर दिनांक २९ चैत्र शके १९४८, रविवार दि.१९ एप्रिल २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### श्रीलंकेच्या धर्तीवर लोकप्रतिनिधींचे निवृत्तीवेतन बंद व्हायला पाहिजे

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

श्रीलंकेच्या संसदेने आर्थिक संकटाच्या काळात सार्वजनिक पैशांची बचत करण्यासाठी आणि राजकीय विशेषाधिकार दूर करण्यासाठी खासदारांची आजीवन निवृत्तीवेतन योजना (४९ वर्षे जुना कायदा) तात्काळ स्थगित केली आहे. या निर्णयानंतर, भारतातही खासदार आणि आमदारांची निवृत्तीवेतन योजना थांबवण्याची मागणी होत आहे, कारण भारतात माजी खासदारांना मासिक निवृत्तीवेतन आणि भत्ते मिळतात.यावर कोट्यवधी रुपय खर्च होतात.

श्रीलंकेच्या संसदेने राजकीय विशेषाधिकार संपुष्टात आणण्याचा एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्या डाव्या विचारसरणीच्या सरकारने ४९ वर्षे जुना संसदीय निवृत्तीवेतन कायदा पूर्णपणे रद्द केला आहे.जुन्या कायद्यानुसार, खासदारांना पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतरच निवृत्तीवेतन मिळत असे, तर इतर सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनासाठी पात्र होण्याकरिता किमान १० वर्षांची सेवा पूर्ण करावी लागत असे. सरकारने हा भेदभाव दूर केला असून आता सर्व खासदारांसाठीची निवृत्तीवेतन प्रणाली तात्काळ प्रभावाने रद्द केली आहे.

राजकारण्यांना मिळणारे अनावश्यक लाभ रोखणे हे राष्ट्रहिताचे आहे, असा राष्ट्रपती दिसानायके यांचा विश्वास आहे. श्रीलंकेच्या अर्थव्यवस्थेला पुनरुज्जीवित करण्यासाठी सध्या आमूलाग्र प्रशासकीय आणि आर्थिक सुधारणा केल्या जात आहेत. राजकारण्यांच्या सोयीसुविधांवर सार्वजनिक पैसा खर्च करण्याऐवजी, तो आता लोककल्याणकारी कार्यक्रमांसाठी वापरला जाईल.,असे स्पष्ट करत

राष्ट्रपती दिसानायके यांनी ऐतिहासिक निर्णय घेत राजकारण्यांची सर्व पेन्शन रद्द करून टाकली

श्रीलंकेच्या २२५–सदस्यीय संसदेत सत्ताधारी पक्षाकडे सध्या दोन–तृतीयांश बहुमत आहे. निवृत्तीवेतन कायदा रद्द करण्याच्या बाजूने सभागृहात १५४–२० मतांनी मतदान झाले, तर केवळ दोन सदस्यांनी याला विरोध केला. न्यायमंत्री हरसाना ननायक्कारा यांनी खासदारांच्या चर्चेच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या निर्णयाला जोरदार पाठिंबा दिला.

माजी राष्ट्रपतींना दिल्या जाणाऱ्या निवासस्थाने, वाहने आणि हजारो अंगरक्षकांसह इतर सुविधांमध्येही सरकारने कपात केली आहे. माजी राष्ट्रपती महिंदा राजपक्षे यांनी आपला सरकारी बंगला रिकामा करण्याची विनंती नाकारल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. माजी नेत्यांसाठी असलेले सरकारी इंधन, सचिवालयातील कर्मचारी आणि वैयक्तिक सुरक्षा यातही मोठ्या प्रमाणात कपात करण्यात आली आहे.

श्रीलंकेच्या या निर्णयानंतर भारतात सोशल मीडियावर आणि जनतेमध्येही अशाच मागण्या जोर धरत आहेत. भारतात माजी खासदारांना पाच वर्षांच्या कार्यकाळानंतर दरमहा ३१,००० रुपये निवृत्तीवेतन आणि अतिरिक्त सेवेसाठी दरवर्षी अतिरिक्त २,५०० रुपये मिळतात,

पेन्शन: ५ वर्षांपेक्षा जास्त काळ सेवा असल्यास, पुढील प्रत्येक वर्षासाठी अतिरिक्त पेन्शन मिळते.

तर विद्यमान खासदारांना दरमहा १,२४,००० रुपये पगार आणि इतर भत्ते मिळतात.

महाराष्ट्रात माजी आमदारांना दरमहा सुमारे ५०,००० रुपये निवृत्ती वेतन मिळते.जर एखादा आमदार एकापेक्षा जास्त टर्म (कालावधी) निवडून आला असेल, तर ५ वर्षांच्या पहिल्या टर्मनंतर प्रत्येक अतिरिक्त वर्षासाठी पेन्शनच्या रकमेत वाढ केली जाते.माजी आमदाराच्या निधनानंतर त्यांच्या पती/पत्नीला () पेन्शनचा लाभ मिळतो, जो सुमारे ४०,००० रुपये असतो.माजी आमदारांना आयुष्यभरासाठी मोफत रेल्वे प्रवासाची सुविधा उपलब्ध असते. त्याच प्रमाणेत्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना वैद्यकीय भत्ते किंवा सुविधा मिळतात.

काही माजी आमदारांचे पेन्शन १ लाखांपेक्षाही अधिक आहे, ज्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर भार पडतो.आमदार/खासदार एका टर्मसाठी निवडून आले तरीही ते पेन्शनसाठी पात्र ठरतात.सरकारी कर्मचाऱ्यांच्या जुन्या पेन्शन योजनेच्या तुलनेत या पेन्शनवर अनेकदा चर्चा आणि टीका होते.

अनेक नागरिकांचा असा विश्वास आहे की सरकारी कर्मचाऱ्यांना अनेक दशकांच्या सेवेनंतर निवृत्तीवेतन मिळते, तर राजकारण्यांना हा लाभ केवळ अल्प कार्यकाळानंतर मिळतो.

## आधुनिक भारताच्या उभारणीत संघाचे योगदान मोठे – डॉ. वि.ल. धारूरकर






ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : आधुनिक भारताच्या आव्हानात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान मोठे आहे, गेल्या शंभर वर्षातील संघाच्या वाटचालीने हे दाखवून दिले आहे की संघ सदैव भारताच्या हिताचे कार्य करत राहिला आहे. असे मत प्रसिद्ध विचारवंत आणि माजी कुलगुरू डॉ. विल धारूरकर यांनी व्यक्त केले.

आपल्या भाषणात त्यांनी १९२५ ते २०२५ या १०० वर्षाच्या काळात संघाच्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेतला. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी विराट हिंदू समाजातील नवचैतन्य जागृत केले असे त्यांनी सांगितले तसेच श्री गोळवलकर गुरुजी यांनी संस्कृतिक राष्ट्रवादाचा पाया घातला आणि डॉ. राजेंद्र सिंग यांनी विज्ञाननिष्ठची जोड दिली, सुदर्शन यांनी डावीकडे वाहत असलेल्या भारतीय तरुणांना पुन्हा उजवीकडे आणले असे सांगितले. बाळासाहेब देवरस यांनी सामाजिक समरसतेचा सिद्धांत मांडला आणि संघ खेडोपाडी नेऊन पोहोचविला, श्री मोहन भागवत यांनी संघाला सामाजिक सुधारणा आणि स्वातंत्र्याचे नवे सामर्थ्य दिले. त्यांच्या काळात संघात सुधारणा पर्वाला सुरुवात झाली असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक भाषणात श्री जयराज कुटे यांनी विराट हिंदू संमेलनाची आवश्यकता का व कशी आहे त्यावर विशेष प्रकाश टाकला. ते म्हणाले की ग्रामीण भागातील कृषी औद्योगिक विकास शैक्षणिक गुणवत्ता तसेच समाज प्रबोधन या सर्व बाबतीत विराट हिंदू संमेलनाचे कार्य सर्वांना दिशा दाखविणारे ठरले आहे. आपल्या भाषणात कुटे यांनी या भागात संघ आणि जनसंघासाठी कार्य करणाऱ्या श्री रावसाहेब दांडगे, रामभाऊ गावंडे, दत्ताजी भाले इत्यादींच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. श्री कुटे यांनी या भागात नवीन औद्योगिक वसाहती स्थापन करण्यासाठी, लघु उद्योगाच्या विकासासाठी आणि तरुणांना रोजगार प्राप्त करून देण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करू असे अभिवचन दिले. त्यांनी आपल्या प्रयत्नामुळे शेंद्रा – बिडकीन – करमाड या भागातील औद्योगिक विकासाची अडकून पडलेले प्रकल्प कसे पूर्ण केले त्याची माहिती दिली. पैठण ते पुणे हा नवा महामार्ग लवकरच साकार होईल आणि त्यासाठी मार्गातील सर्व अडथळे दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करू असे अभिवचनही कुटे यांनी दिले.

ते वरुड काजी येथे विराट हिंदू संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून धारूरकर बोलत होते याप्रसंगी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री जयराज कुटे हे होते

प्रारंभी श्री हरिभाऊ दांडगे यांनी प्रास्ताविक केले आणि विराट हिंदू संमेलनाची संकल्पना स्पष्ट केली

याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे समन्वयक महानुभाव पंथाचे आचार्य श्री महंत बाभूळगावकर शास्त्री आपल्या भाषणात म्हणाले की भारतीय संतांनी अत्यंत कठीण परिस्थितीत राष्ट्रीयत्वाची भावना जोपासली आहे. संतांच्या समाज प्रबोधनामुळे देश आज संपन्न आणि प्रगतीपथावर आहे, त्यांनी महाराष्ट्रातील महानुभाव संप्रदाय वारकरी संप्रदाय तसेच अन्य संप्रदायांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

याप्रसंगी इस्कॉनचे प्रमुख श्री रुक्मिणी रमण प्रभुपाद महंत यांचेही भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात आपण अध्यात्म विसरता कामा नये, धर्म आणि अध्यात्मामुळे समाजाला नैतिक अधिष्ठान प्राप्त होते आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करू शकतो. शहरी आणि ग्रामीण भागात सुद्धा इस्कॉन करत असलेल्या समाज प्रबोधन आणि संस्कृती संवर्धन कार्याची त्यांनी विस्ताराने माहिती दिली. त्यांनी आपल्या भाषणात वेद गीता उपनिषदे यातील संदर्भ दिले तसेच अनेक लघुकथांच्या माध्यमातून त्यांनी श्रोत्यांना धार्मिक आणि अध्यात्मिक गुणवत्तेचे महत्व विषद केले.

याप्रसंगी बोलताना मच्छिंद्र पळसकर महाराज म्हणाले की वर्तमान काळामध्ये महाराष्ट्राला प्रगतीपथावर घेऊन जाण्यासाठी ग्रामीण भागात सत्संग आणि अध्यात्मिक जागृतीची अत्यंत आवश्यकता आहे त्यामुळे समाजामध्ये नैतिक मूल्य वाढीस लागेल.


तसेच याप्रसंगी वैजापूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री बाळासाहेब चव्हाण यांचे विशेष मार्गदर्शन झाले आपल्या अभ्यासपूर्ण भाषणामध्ये श्री बाळासाहेब चव्हाण यांनी संघाने आजवर केलेल्या कार्याची माहिती दिली आणि मराठवाडा विभागात स्व. दत्ताजी भाले यांच्यासारख्या ध्येयवादी कार्यकर्त्यांनी केलेल्या योगदानामुळे संघाचे काम खेडोपाडी पोचले आहे असा विशेष संदर्भ दिला. मा. श्री प्रल्हादजी अभ्यंकर यांच्या सहवासातील काही आठवणीही त्यांनी सांगितल्या, याप्रसंगी शेवटी गणेश कोरडे यांनी आभार मानले आणि विराट हिंदू संमेलनाची यशस्वी सांगता झाली.

वरुड आणि शेंद्रा या दोन्ही मंडळातील १५ गावातील सुमारे ८०० कार्यकर्ते या संमेलनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते या प्रसंगी हे संमेलन यशस्वी करण्यासाठी श्री सुनील कुलकर्णी तसेच सोमनाथ भाऊसाहेब कसकुरे, हरिभाऊ दांडगे, विवेक दांडगे, कृष्णा दांडगे तसेच सोमीनाथ कचकुरे, रवी तांबे, बाळू कचकुरे यांनी विशेष परिश्रम घेतले

बबन काकडे यांनी याप्रसंगी सभा स्थानाचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे केले होते उपस्थितांना भोजन नाश्ता तसेच चहापाण्याची व्यवस्था ही उत्तम प्रकारे करण्यात आली होती. संभाजीनगर ग्रामीण भागातील एक सर्वोत्कृष्ट हिंदू संमेलन अशा लौकिक या संमेलनाचा पसरला आहे.

## साडेतीन मुहूर्तापैकी एक – अक्षय्य तृतीया

ज्योतिर्मय साहित्य




आज,रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय तृतीया हा हिंदू धर्मातील एक महत्वाचा सण, दिवस आहे. जैन आणि हिंदू दोघेही साजरा करत असलेली अक्षय तृतीया, हा भारतातील वसंत ऋतूतील एक महत्त्वाचा सण आहे. हिंदू पंचांगानुसार वसंत किंवा वैशाख महिन्याच्या तिसऱ्या चंद्र दिवसावरून या सणाला त्याचे नाव मिळाले आहे. साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक असलेला हा संपूर्ण दिवस सनातन धर्मात अत्यंत शुभ मानला जातो. अक्षय तृतीयेचा दिवस वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीयेला साजरा केला जातो. या दिवशी केलेले कोणतेही शुभकार्य अक्षय म्हणजेच अविनाशी मानले जाते. तसेच भगवान विष्णूच्या सहाव्या अवताराचे रूप असलेल्या परशुरामांचा जन्म याच दिवशी झाला असल्याने परशुराम जयंती देखील यादिवशी साजरी करतात.

यादिवशी काही वस्तू खरेदी करणे अत्यंत भरभराटीचे लक्षण मानले जाते. देवी लक्ष्मी आणि विष्णूची पूजा केल्यानेत्यांची कृपा यादिवशी मिळते आणि घरात समृद्धी सुखशांती येते असे मानतात.

धार्मिक पौराणिक कथेनुसार भगवान श्रीकृष्णांनी पांडवांना याच दिवशी अक्षय पात्र भेट दिले होते.त्यातील अन्न कधीच संपत नसे, यामुळे त्यांना आपल्या वनवास प्रवासात उपाशी राहावे लागले नाही. कारण अक्षय या शब्दाचा अर्थच आहे अविनाशी म्हणजेच कधीही न संपणारा. यामुळे हा दिवस पवित्र मानतात कारण यादिवशी खरेदी केलेली वस्तू शुभ परिणाम देते, आयुष्यात भरभराटी घेऊन येते.




हा दिवस साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक असल्याने यादिवशी शुभकार्य केली जातात. तसेच नवीन वस्तू देखील घेतात. अक्षयतृतीयेला सोने आणि चांदी घेणे अत्यंत शुभ मानले जाते. तसेच यादिवशी वास्तू खरेदी करणे सुद्धा शुभ मानतात. गृहप्रवेश केला जातो, वास्तुशांती देखील घातली जाते. नवीन गाडी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर अनेकजण घेतात. अक्षय तृतीयेच्या दिवशी दान करण्याला अत्यंत महत्व आहे. यादिवशी गोर गरिबांना अन्नदान करणे शुभ मानतात. तसेच पक्षांना धान्य टाकणे, गरजुंना आवश्यक वस्तू दान करणे महत्वाचे मानले जाते.

अक्षय तृतीयेच्या दिवशी देवी लक्ष्मी आणि विष्णूची पूजा करण्याची प्रथा आहे. देवी लक्ष्मीला आपण धनसंपत्तीचे प्रतीक मानतो. असे म्हणतात यादिवशी देवीची पूजा केल्याने तिची कृपा प्राप्त होऊन घरात धनसंपत्ती, समृद्धी येते. दिवा,धूप लावून, हार फुले वाहून देवीची आराधना करावी. काहीजण कलश मांडून देखील पूजा करतात. तसेच घरात गोडाचा नैवेद्य करून तो देवाला अर्पण करावा.

अक्षय्य तृतीया या सणाला हिंदू धर्म आणि ज्योतिषशास्त्रात मोठे महत्त्व आहे.अक्षय्य तृतीया, ज्याला अख्खा तीज, अक्टी किंवा परशुराम जयंती म्हणूनही ओळखले जाते. पौराणिक कथेनुसार, याच दिवसापासून त्रेतायुग सुरू झाले होते.असे मानले जाते की, या दिवशी स्वर्गलोकातून गंगा माता पृथ्वीवर अवतरली होती. अन्नाची अधिष्ठात्री देवता माता अन्नपूर्णा हिचा जन्म याच दिवशी झाला होता.

अक्षय्य तृतीयेशी जोडलेल्या दंतकथा

या शुभ दिवसाशी अनेक आख्यायिका जोडलेल्या आहेत, परंतु त्यातील सर्वात महत्त्वाची आख्यायिका देवी अन्नपूर्णा यांच्याशी संबंधित आहे. शास्त्रानुसार, देवी पार्वतीचा अवतार असलेल्या अन्नपूर्णा देवी, अक्षय तृतीयेच्या दिवशी भुकेल्यांना उदारपणे अन्न देण्यासाठी प्रकट झाल्या.

अशी आख्यायिका आहे की, भगवान शिव भिकाऱ्याच्या वेशात अन्नपूर्णा देवीला भेटले आणि त्यांनी अन्नाची याचना केली. कोणालाही आश्चर्य वाटेल की विश्वाच्या स्वामीला अन्नासाठी भीक मागण्याची गरज का भासली असेल.

(क्रमशः)










## जात्यावरच्या ओव्या......

भाऊ बोलतो मधाळ
लोक ऐकती ध्यानान
त्यान मानसन्मान
कमवला ग कष्टान ||६०१||

भाऊ मिटवितो तंटा
लोक दाटले भवती
किती चहाचे कप?
वैनी उकळू म्हणती ||६०२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २१




ज्योतिर्मय साहित्य

मना वासना चुकवी येरझारा ।
मना कामना सांडि रे द्रव्यदारा ।
मना यातना थोर हे गर्भवासी ।
मना सज्जना भेटवी राघवासी ।२१ ।

अर्थ : हे मना, वासनेमुळे जीव जन्म मरणाच्या फेऱ्यात ( येरझारा )अडकतो. त्या वासनेचा त्याग कर म्हणजे जीव जन्म मरणाच्या फेऱ्यात अडकणार नाही. पैसा आणि स्त्री सुख यांच्याबद्दल मोह बाळगू नकोस. कारण वासनेच्या पोटी जन्म घ्यावा लागतो आणि गर्भवासाच्या यातना भयंकर असतात. म्हणून हे मना भगवंताची भेट करून घे.



विवेचन : जन्माआधी आणि जन्माच्या प्रसंगी होणाऱ्या यातना किती भयंकर असतात हे समर्थांनी आधीच्या श्लोकात सांगितले आहे. या श्लोकात ते आपल्याला म्हणतात की वासनेच्या पोटी जन्म घ्यावा लागतो म्हणून या वासनांचा त्याग करायला हवा. वासनाच नसतील तर जन्म मृत्यूचा प्रश्नच उद्भवणार नाही. या श्लोकात चुकवी हा शब्द वासना आणि येरझारा या दोन्हीसाठी आहे. आपल्याला वासना आणि येरझारा दोन्हीही चुकवायच्या आहेतच. वासना चुकवली तर येरझारा आपोआपच चुकतील.


वासना या निरनिराळ्या प्रकारच्या असतात त्यातही त्यांचे दोन प्रमुख प्रकार सांगता येतील. सद् वासना आणि दुर्वासना. दोन्हींपैकी कोणत्याही प्रकारची वासना असेल तरी पुनर्जन्म हा अटळ आहे. परंतु त्यातल्या त्यात सद्वासना म्हणजे चांगल्या वासना असतील तर पुन्हा जन्म मिळाला तरी हरकत नसते. समाजोपयोगी कार्य करणे, संतांचा सहवास लाभणे किंवा परमेश्वर भक्तीची इच्छा धरणे या सद्वासना आहेत. या सद्वासनांमुळे आत्मिक उन्नती होण्यासाठी मदत होते. षडरिपूंच्या नादी लागून त्या वासना अपूर्ण जर राहिल्या असतील तर त्या पूर्ण करण्यासाठी पुनर्जन्म घ्यावा लागतो. परंतु त्याने शेवटी मनुष्याची अधोगतीच होते आणि मुक्तीपासून तो दूर जातो.

संत तुकाराम महाराजांना संतसंग आणि भगवद्भक्तीची आस होती. ते म्हणतात –

न लगे मुक्ती आणि संपदा, संतसंग देई सदा।
तुका म्हणे गर्भवासी सुखे घालावे आम्हासी ।।

संतांचा, सज्जनांचा संग म्हणजे सहवास मिळावा, परमेश्वराची भक्ती कायम लाभावी म्हणजे जेणेकरून त्यातील गोडी कायम अनुभवता येईल. म्हणून त्यांना गर्भवास म्हणजे पुन्हा जन्म घेणेदेखील मान्य आहे.

तुकाराम महाराजांसारख्या संतांची ही सद्वासना झाली. परंतु या ऐहिक जीवनात सामान्य मनुष्य एवढा गुंतून जातो की त्याच्या अनेक प्रकारच्या वासनांची पूर्ती कधी होतच नाही. ज्याप्रमाणे अग्नीमध्ये जेवढे इंधन घालावे तेवढा तो अधिक प्रज्वलित होतो. तशा या दुर्वासना देखील वाढत जातात आणि अंतकाळी या वासना कायम असतील तर त्या पोटी मनुष्याला पुनर्जन्म घ्यावा लागतो. सत्ता, संपत्ती आणि स्त्री संबंधित वासना कधी संपतच नाहीत. कामिनी आणि कांचन यांच्या वासना सर्वात जास्त प्रबळ आहेत. त्यांच्यावर मात करणे सोपे नाही. इतर वासना त्यामानाने गौण आहेत. आज जगातील घडणारे बहुतेक गुन्हे आणि वाईट घटना कामिनी आणि कांचनाच्या हव्यासापायीच घडत आहेत. चित्रपटातून आणि टीव्हीवरील विविध प्रकारच्या धारावाहिकांमधून अशाच घटना समोर येतात. त्यापासून बोध घेण्याऐवजी त्यातील वाईट गोष्टींचा प्रभाव समाजमनावर अधिक पडतो. भ्रष्टाचाराच्या घटनांबद्दल तर न बोललेले बरे इतक्या त्या नित्याच्या झाल्या आहेत. **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## सुविचार - प्रकाश




प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

♦
काळ कितीही बदलला तरी
मुल्ये कधीच बदलत नाहीत
यांत्रिक भौतिक वैज्ञानिक
प्रगती झाली तरी
मुल्ये चिरकाल चिरंतर टिकून राहतात

♦
थोरामोठ्यांविषयी आदर बाळगा
मान सन्मान नित्य त्यांचा ठेवा
समाज देश जगात वावरताना
सौजन्य शीलता नेहमी कृतीत ठेवा

## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. ‘राम कर्ता’ ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. ‘कर्म करा’ असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे.........
त्याच्या भावांनी सर्व मालमत्ता आपसात वाटून घेतली. नभागाला कांहीच ठेवले नाही. ते म्हणाले आम्ही तुला विसरलो. हा म्हणे ठीक आहे, आता वाटा द्या. भाऊ म्हणे तुझ्या वाट्यास वडील दिले.हा सरळ मनाचा होता .तो आनंदाने याला तयार झाला. वडील म्हणाले तू यज्ञात जा. हे मंत्र पाठ कर. तेथील ब्राह्मण मंत्र विसरले की तू ते सांग. तसेच झाले. ब्राह्मण मंत्र विसरले नाभाग ते बोलला. त्यांनी नाभागाला यज्ञातील उर्वरित धान्य दिले. ते घेऊन येताना रस्त्यात एक काळा पुरुष, हातात काठी घेऊन उभा होता. तो म्हणाला यज्ञ झाल्यावर जे उरेल त्यावर माणसाचा अधिकार नसतो.ते धान्य इथेच ठेव. नाभाग म्हणाला हे धान्य इथेच ठेवतो ,आणि वडिलाना विचारतो. नाभाग गेला, त्याने वडिलाना विचारले, असे असे झाले? काय करू? वडील म्हणाले, यज्ञात उरलेले धान्यावर रुद्राचा अधिकार असतो.तो काळा पुरुष कदाचित रुद्र असतील ते बरोबर आहेत. पुन्हा ते दोघे त्या काळ्या व्यक्तीकडे गेले.त्याची क्षमा मागून त्याला ते धान्य अर्पण केले. दंडवत घातला. इतका नाभाग सरळ मनाचा होता.त्यावेळी त्या काळ्या पुरुषातून भगवंत प्रकटले व त्याचा उद्धार केला.

■ 10 व स्कंद

भगवान कृष्णाचा अवतार झाला. ते एकटे अवताराला येत नाहीत.त्यांच्या कार्य सिद्धी साठी जे जे आवश्यक आहे, त्या त्या वस्तू , व्यक्ती यांचा अवतार होतो.

भगवान चतुर्भुज रूपात प्रकटले होते. देवकी म्हणाली, देवा या अलौकिक रूपा वर वात्सल्य कसे करू? तुम्ही साधारण रूप घ्या. देवानी लगेच सामान्य रूप घेतले. नंतर भगवंताच्या सुचनेप्रमाणे त्यांना नंदाचे घरी नेण्यात आले व तिथे जन्मलेल्या महामायेस मथुरेत आणले. अशा रितीने श्री कृष्ण परमात्म्याचा अवतार झाला.
हाथी घोडा पालखी जय कन्हैया लाल की
श्रवन करता करता कथेचे धावते संकलन

✍️मधुकर बोरीकर
9403061886



## आरोग्य संजीवनी

## आरोग्याबाबत खूप काही सांगतात नखं

ज्योतिर्मय साहित्य

जाणून घ्या कोणत्या आजारात कशी दिसतात नखं.....!

बोटांची नखं हाताचं सौंदर्य वाढवतात, सोबतच नखांवरून शरीराच्या आत काय सुरू आहे हेही माहीत पडतं. नखं काही आजारांचे संकेतही देतात, त्यामुळे या संकेतांकडे दुर्लक्ष करणं महागात पडू शकतं. याबाबत न्यूट्रिशनिस्ट किरण कुकरेजा यांनी माहिती दिली आहे. इन्स्टाग्रामवर व्हिडीओ पोस्ट करून त्यांनी सांगितलं की, नखांवर कोणकोणत्या आजारांची माहिती मिळू शकते. या समस्या लाइफस्टाईलच्या काही चुकांमुळे होऊ शकतात. चला तर जाणून घेऊ नखं आरोग्याबाबत काय सांगतात.

नखांवर दिसतात आजारांचे संकेत...

नखांवर पांढरे डाग...

न्यूट्रिशनिस्टनुसार, नखांवर दिसणारे पांढरे डाग किंवा स्पॉट कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे होऊ शकतात. त्याशिवाय शरीरात व्हिटॅमिन डी ची कमतरता आणि आयर्नची कमतरता किंवा थायरॉइड डिसऑर्डर झाल्यावरही नखांवर पांढरे डाग येतात.

नखं तुटणे...

जर तुमची नखं सहजपणे तुटक असतील किंवा त्यांना भेगा पडत असतील तर हा शरीरात व्हिटॅमिन बी६, मॅग्नेशिअम किंवा व्हिटॅमिन बी १२ कमी असल्याचा संकेत असू शकतो.

मुलायम आणि ड्राय नखं...

कमी प्रोटीन असलेली डाएट घेतल्यानं नखं मुलायम आणि ड्राय होऊ शकतात. त्याशिवाय लिव्हरमध्ये काही समस्या असल्यावर नखांवर अशाप्रकारचे संकेत दिसतात.

निळे किंवा पर्पल नखं...

ऑक्सीजनची कमतरता किंवा फुफ्फुसं व हृदयासंबंधी समस्या असल्यावर नखं निळे किंवा जांभळ्या रंगाचे दिसू शकतात. अशात तुमची नखं जर निळ्या किंवा जांभळ्या रंगाचे दिसत असतील तर वेळीच डॉक्टरांना संपर्क करा.

पिवळे किंवा वाकडे...

शरीरात आयर्न कमी झालं असेल तर नखं पिवळ्या रंगाची आणि चमच्याच्या आकाराची दिसू शकतात. जर नखं आतल्या बाजूनं वाकलेली असतील तर शरीरात आयर्न कमी असू शकतं.

पिवळी नखं...

नखं जर पिवळ्या रंगाची दिसत असतील तर लिव्हरसंबंधी समस्या आणि फंगल आजारांचा संकेत असू शकतो. जर नखं पिवळ्या रंगाची दिसत असतील तर जराही वेळ न घालवता डॉक्टरांना संपर्क करा.

लाइफस्टाईलमध्ये करा बदल...

- हेल्दी आणि संतुलित आहार घ्या.
- रोज कमीत कमी एक तास फिजिकल ॲक्टिविटी करा.
- पुरेशी म्हणजे रोज ७ ते ८ तासांची झोप घ्या.
- शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी दिवसभर भरपूर म्हणजे ८ ते १० ग्लास पाणी प्या.
- स्ट्रेस कमी करा. यासाठी प्राणायाम किंवा इतर एक्सरसाईज करा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

♦मोठेपणा

एका जंगलात एक कोल्हा राहत होता. कोल्हा एकदा खड्डयात पडल्याने तो लंगडा झाला. त्याला शिकार मिळेनाशी झाली. उपासमारीने तो वैतागुन गेला व एकदा तो जंगलाच्या राजास भेटण्यास गेला. त्याने राजास विनंती केली की मला तुमचा सेवक म्हणून ठेवून घ्या. तुमचे उष्टे खाऊन माझे पोट भरतो. सिंहाला त्याची दया आली. सिंह म्हणाला,"कोल्ह्या तू समोरच्या शिळेवर उभे राहून जंगलात लक्ष ठेवायचे. एखादा प्राणी दिसला की जोरात ओरडायचे. पूर्ण ताकदीनिशी तुटून पडा जंगलचे राजे सिंहमहाराज" कोल्हा या गोष्टीला तयार झाला. कोल्हा रोज सूचना देत होता आणि सिंह शिकार करायचा. काही काळ निघून गेला व कोल्ह्याला वाटू लागले की मी जोराने ओरडतो म्हणूनच सिंह शिकार करू शकतो. माझ्या ओरडण्यातच काहीतरी जादू आहे ज्यामुळे सिंह अन्न मिळवू शकतो. त्याने ही शंका सिंहाच्या कानावर घातली व म्हणाला," सिंहमहाराज, आता इथून पुढे तुम्ही शिळेवर उभे राहून डरकाळी फोडायची व ओरडायचे की पूर्ण ताकदीने तुटून पडा कोल्हे राजे" तुम्ही असे ओरडताच मी त्या प्राण्यावर हल्ला करेन व त्याला ठार मारेन. सिंहाने या गोष्टीवर सहमत न होता त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण कोल्हा हट्ट धरून बसला. शेवटी सिंह शिळेवर जाऊन उभा राहिला व डरकाळी फोडली. कोल्ह्यानेही मग अंगात फार ताकद असल्यासारखे शिकार काय आहे न पाहताच हल्ला केला. पण सावज हे लहानसहान प्राणी नव्हता तर तो एक हत्ती होता. हत्तीच्या अंगावर कोल्ह्याने उडी मारताच हत्तीने त्याला सोंडेत धरून लांब फेकून दिले. कोल्हा एका मोठ्या खडकावर आपटून मरून गेला.

तात्पर्य :-मोठ्यांचे मोठेपण हे त्यांच्या कृतीत असते. असे मोठेपण मिळविण्यासाठी व टिकविण्यासाठी सुद्धा स्वत:च्या अंगी काही तरी अक्कल असावी लागते.

# अक्षय तृतीया







**ज्योतिर्मय साहित्य**

वैशाख शुद्ध तृतीया या दिवशी अक्षय तृतीया हा सण साजरा होतो. हा साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त समजण्यात येतो. या दिवशी काल विवेक या ग्रंथात दिल्याप्रमाणे व्रत करणे गरजेचे असते. जैन धर्मातही या दिवशी व्रत करतात. अक्षय तृतीयेलाच ''आखा तीज'' असेही म्हणतात.

अक्षय तृतीया ही अन्नपूर्णा मातेची, तसेच नर, नारायण, परशुराम, महात्मा बसवेश्वर, हयग्रीव या सर्वांची जयंती तिथी आहे. भगवान व्यास यांनी या दिवशी महाभारत ग्रंथरचना करण्यास सुरुवात केली. त्यांचे लेखनिक म्हणून गणपतीने काम केले, अशी आख्यायिका आहे.

जैन पंथातील प्रथम तीर्थंकर भगवान श्री ऋषभ देव यांनी एक वर्षभर उपवास करून राहिले होते. या उपवासाची सांगता एक भक्त श्री श्रेयांस कुमार यांनी ऋषभ देवांना उसाचा रस देऊन याच दिवशी केली. आजही जे वर्षी तप करतात म्हणजे एक वर्षभर संपूर्ण उपवास ठेवतात, ते त्यांच्या उपवासाची सांगता, आजच्याच दिवशी करतात. म्हणून आज उसाच्या रसाच्या दानाला ही अत्यंत महत्त्व आहे.

या दिवशी दानधर्माला खूप महत्त्व आहे. कारण याचे पुण्य फळ अक्षय सदा सर्वकाळ टिकून राहते.

अक्षय तृतीया या दिवशीच सत्ययुग आणि त्रेता युगाचा प्रारंभ झाला.

परशुरामाचे अवतरण याच दिवशी झाले होते. म्हणून या दिवशी परशुरामांची पूजा केली जाते. वृंदावनच्या बांके बिहारी मंदिरात फक्त याच दिवशी श्री विग्रहाचे चरण दर्शन होते. इतर दिवस वर्षभर ते वस्त्राने झाकलेले असतात.

अक्षय तृतीयेच्या दिवशी बद्री नारायण मंदिराचे दरवाजे उघडले जातात. हे दरवाजे उघडले की, दिवाळीतल्या भाऊबीजेच्या दिवशी पुन्हा ते बंद करण्यात येतात

या दिवशी गंगा स्नानाला वेगळे महत्त्व आहे. जो या दिवशी गंगा स्नान करेल तो पापातून मुक्त होईल, अशी धारणा आहे. श्रीकृष्णाने युधिष्ठिराला असे सांगितले होते की, या तिथीला केलेले दान, हवन क्षयाला जात नाही. म्हणून हिला अक्षय तृतीया म्हणतात. देव व पितर यांना उद्देशून जे कर्म केल्या जाते, ते सर्व अक्षय म्हणजेच अविनाशी होते. अक्षय तृतीयेला आणखी महत्त्व यासाठी आहे की, स्वर्गात वाहणारी गंगा याच दिवशी पृथ्वीवर अवतीर्ण झाली.

अक्षय तृतीया हा एक शुभ मुहूर्त समजला जातो. त्यामुळे या दिवशी सोने चांदी यांची खरेदी करतात. या दिवशी गायींची सेवा करावी. हा, नवीन घर खरेदीसाठी ही उत्तम मुहूर्त आहे.

पितृ तर्पण

या दिवशी पितरे पृथ्वीवर येतात व आपल्या वंशाजा कडून तर्पण स्वीकारतात. या दिवशी अर्पण केलेले तर्पण हे पितरांना चिरकाला साठी लाभते. उन्हाळ्यात हे पर्व येत असल्याने जल दान यात महत्त्वाचे समजण्यात येते. पित्रे असे तर्पण मिळाले की तृप्त होऊन आपल्या वंशजांना आशीर्वाद देतात.

स्कंद पुराणात उल्लेख

वैशाखे शुक्लपक्षे तृतीया या भवेत शुभा

तस्यां दत्तं जलं तिलैः पितृनामक्षय भवेत

पद्म पुराणात उल्लेख

यत्किंच दीयते दानं; स्वल्पं वा यदी बहू

तत्सर्वंमक्षयं ज्ञेयं तृतियायां विशेषतः

तृतीयेच्या दिवशी दिलेले दान हे स्वल्प असले किंवा खूप असले तरी ते अक्षय काळापर्यंत त्याचे पुण्य लाभते.

तैतरीय संहिता (वैदीक आधार)

भौतिक सुख लोलूप आपण माणसे, बरेचदा असे म्हणतो की, मृत व्यक्ती बद्दल कांही करण्याची काय गरज आहे? पण त्यांची प्रसंगोपात अन्न व जलावर वासना जाते. त्यांना हे अन्न व जल श्राद्धविधी व तर्पण विधी याद्वारे केवळ मिळू शकते.

एखाद्याला अचानक मृत्यू आला, किंवा त्याचे श्राद्धविधी करणारे कोणी नसेल, तर बरेचदा तो प्रेत योनीत अडकून पडतो. अशा वेळेस त्याला दुसरा कोणताही मार्ग नसतो, म्हणून तो ते जल व अन्न हे आपल्या वंशाजा कडून अपेक्षित ठेवतो. आपण जर ही कर्मे केली नाहीत तर, त्याला गती प्राप्त होत नाही. म्हणून तो आपल्या वंशजांना त्रास देऊन सूचना करतो की, तुम्ही हे करा. म्हणून बरेचदा घरात कलह माजणे, कोणती काम सरळपणे होत नसणे, अडचणी येणे, वारंवार दुखणी बहानी उद्भवणे, असे होत असेल तर ज्योतिषी नारायण नागबळी करायला सांगतात. असा विधी यथा सांग पार पडल्यानंतर बरेचदा वरील अडचणी कमी झाल्या असा अनुभव येतो. म्हणून केवळ आपले भौतिक जीवन न पाहता आपल्या पितरांचे ही स्मरण ठेवावे, व त्यांचे साठी तिथीनुसार श्राद्ध व दैनिक तर्पण विधी सांगितला आहे. निदान अक्षय तृतीया सारख्या पर्वावर तरी आपल्या पितरांचे स्मरण करून त्यांना तर्पण करावे व मनात कृतज्ञता भाव व्यक्त करावा. त्यांचे आशीर्वाद असतील तरच, तुमचे जीवन आनंदाने चालणार असते.

स्वधा नमः पितृभ्यः तैतरीय संहितेत पितरांना अर्पण तर्पण करणे हे कर्तव्य सांगितलेले आहे.

मनुस्मृती तिलैः जलैःच विधिवत पितृन तर्पयेत सदा तीळ व जलाने पितरांचे तर्पण करणे हे नेहमीचे कर्तव्य आहे. हा ज्याचा त्याचा श्रद्धेचा विषय आहे. या लेखात सांगितलेले मत हे शास्त्रानुसार आहे. तसे करावे, किंवा न करावे हे ज्याचे त्याने ठरवावे.

# श्रीयश टेक्निकल कॅम्पसमध्ये इंडस्ट्री एक्स्पर्ट पॅनेल डिस्कशनचे उत्साहात आयोजन




**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनल मॅनेजमेंट (एनआयपीएम), छत्रपती संभाजीनगर चॅप्टर आणि सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल, श्रीयश शैक्षणिक समूह संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आज श्रीयश टेक्निकल कॅम्पस येथे ''कौशल्य आणि पदवी: आजच्या काळात चांगली नोकरी किंवा करियरसाठी काय अधिक महत्वाचे?'' या विषयावर उद्योग तज्ज्ञांचे पॅनेल चर्चासत्र यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आले.

या चर्चासत्रामध्ये कॉर्पोरेट क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये श्री. अनुराग कल्याणी (मुख्य मानव संसाधन अधिकारी, निडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया लिमिटेड), श्री. पुनीत धिंग्रा व्यवस्थापकीय संचालक लॉयल इन्फो सर्विसेस, श्री. विजय साळवे (सहाय्यक महाव्यवस्थापक मानव संसाधन, औद्योगिक संबंध व प्रशासन, मेटलमन ऑटो लिमिटेड), श्री. संदीप पिंपळे (सहाय्यक महाव्यवस्थापक मानव संसाधन, ग्राइंडमास्टर मशिन्स लिमिटेड), श्री. नितीन दाभाडकर (व्यवस्थापक मानव संसाधन व प्रशासन, भोगले ऑटोमोटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड), श्री. आनंद काकडे (व्यवस्थापकीय संचालक, एएसके एचआर सोल्यूशन्स) तसेच शरयू पगारे (सहाय्यक उपाध्यक्ष मानव संसाधन, चॉइस ग्रुप, मुंबई) यांचा समावेश होता.

उद्योग तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्त्व, पदवी व कौशल्य यांचा समतोल, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील प्रगती, प्रशिक्षणार्थी कालावधी व प्रमाणपत्रांचे महत्त्व, उदयोन्मुख तंत्रज्ञान, तांत्रिक व हस्तांतरणीय कौशल्ये, तसेच उद्योगातील कार्यपद्धती, कार्यसंस्कृती आणि नोकरीची आवश्यकता याबाबत सखोल मार्गदर्शन केले. ''पदवी ही वाहनाची किल्ली आहे'' असे सांगत कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच व्यावसायिक मार्गदर्शनाचा वापर, उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य उपयोग, प्रशिक्षणार्थी संधी आणि द्वितीय श्रेणी शहरांमधील संधी यावरही विशेष भर देण्यात आला.


कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. अनिल पालवे (प्रमुख, सेंट्रल टीपीसी) यांनी केले. यावेळी संस्थेचे अधिष्ठाता (शैक्षणिक) डॉ. पी. एम. अर्धापुरकर, संचालक डॉ. सचिन वानखेडे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन व पॉलिटेक्निकचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरूळे यांनी या यशस्वी उपक्रमाबद्दल सेंट्रल टीपीसी टीमचे अभिनंदन केले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धात्मक नोकरीच्या क्षेत्रात आवश्यक असलेल्या कौशल्यांची जाणीव करून देणारा ठरला.

# मागोवा या भाषाविषयक ग्रंथाचे सभुमध्ये २१ एप्रिलला प्रकाशन

## मराठी प्रमाणलेखनाच्या अभ्यासाला मिळणार नवा आयाम!




**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – प्रतिनिधी

मराठी प्रमाणलेखनाची अद्ययावत आणि अभ्यासपूर्ण नोंद घेणारा; भाषाभ्यासाला एक नवा आयाम देणारा डॉ. नागेश अंकुश यांनी लिहिलेला प्रमाण मराठी भाषेच्या प्रमाणलेखनाचा इतिहास हा ग्रंथ मंगळवार, दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी प्रकाशित होत आहे.

श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्था संचालित सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर आणि राजहंस प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ५.३० वाजता संस्था परिसरातील गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृहात हा प्रकाशन समारंभ होत आहे.

या कार्यक्रमात साहित्य अकादमी, भारत सरकार नामनिर्देशित सदस्य, (नवी दिल्ली) लेखक डॉ. नरेंद्र पाठक यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होईल. सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य लेखक डॉ. विवेक मिरगणे अध्यक्षस्थानी असतील. समीक्षक व भाषा अभ्यासक डॉ. केशव तुपे ( प्राध्यापक, शासकीय ज्ञान- विज्ञान महाविद्यालय, अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती असून भाषा संशोधक डॉ. आनंद काटीकर (मराठी विभाग प्रमुख ,फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे) हे या

ग्रंथाविषयी भाष्य करणार आहेत. ब्याण्णव वर्षीय ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध झालेल्या या ग्रंथाला शंभरी पूर्ण करणाऱ्या ज्येष्ठ भाषातज्ज्ञ यास्मिन शेख यांची दीर्घ प्रस्तावना आहे. या प्रकाशन समारंभासाठी भाषा आणि साहित्य क्षेत्रातील रसिकांनी ,अभ्यासकांनी अगत्याने उपस्थित राहावे, असे आवाहन उपप्राचार्य प्रा. सीमा सिद्दिकी व राजहंसचे अप्रूप देशपांडे यांनी केले आहे.

# समाज आणि भोंदूगिरी






**ज्योतिर्मय साहित्य**

आजचा सर्व स्तरातील बहुतांश समाज सुशिक्षित आहे. तरी तो भोंदूगिरीत अडकत चाललेला दिसतो आहे. त्याचे काय कारण असावे समजत नाही. नोकरीतील ताणतणाव, कामाचे दडपण, बॉसची दादागिरी, मोठ्या पदाची अपेक्षा आणि यातून येणारे नैराश्य यामुळे एखाद्याने सुचवले की, ''अमुक एक बाबा किंवा साधू चांगला आहे. तो आपल्या सर्व समस्या दूर करतो.'' तेव्हा निराशेने ग्रस्त असलेल्या माणसाला हे सारे खरे वाटते. जेव्हा एखाद्या व्यक्तीला समस्या येते, तेव्हा तो तात्काळ उपाय शोधतो. अशा वेळी भोंदू लोक त्याच्या कमकुवतपणाचा फायदा घेतात. तोही मग त्या बाबाच्या जाळ्यात फसतो. असेच अनेकजण यात अडकत जातात. हा एक भोंदूगिरीचा प्रकारच आहे. यात उच्चशिक्षित तसेच उच्चपदस्थही अडकतात अन् अंधश्रद्धेकडे वळतात. खोट्या भूलथापांना बळी पडतात. त्यावेळी त्यांची विवेकबुद्धी काम करीत नाही. त्यांना स्वतःबद्दल असुरक्षितता वाटायला लागते. भीती वाटते. यास्तव ते अशा भोंदूबाबाला शरण जाऊन तो सांगेल त्याप्रमाणे करतात. या वेळेला ते कसलाही विचार करीत नाहीत. खरे तर अशा वेळी शांत डोक्याने आत्मपरीक्षण करणे फार महत्वाचे असते. समाज जितका प्रगत होत आहे, तितक्याच वेगाने अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीचे जाळेही विस्तारत चालले आहे. ही एक चिंताजनक बाब आहे. विज्ञान, शिक्षण आणि तंत्रज्ञानाने माणसाच्या जीवनात मोठे बदल घडवले असले, तरी आजही समाजातील अनेक लोक अंधश्रद्धा, चमत्कार आणि भोंदू लोकांच्या प्रभावाखाली येताना दिसतात. या परिस्थितीमुळे केवळ व्यक्तीचे नुकसान होत नाही, तर समाजाची प्रगतीही थांबते.


आपला सध्या श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातच मोठा गोंधळ झालेला आहे. श्रद्धा कोणती आणि अंधश्रद्धा कोणती यातील फरकच समजेनासा झाला आहे. श्रद्धेच्या नावाखाली माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अनेक घटना घडत आहेत. त्या वारंवार का घडतात हा विचार करणे गरजेचे आहे. आपण एवढे अंधश्रद्धाळू कसे? आपली बुद्धी नाही का विचार करीत? आपण कुणासमोर नतमस्तक व्हायचे, कुणासमोर नाही, याचा विचारच आपल्या मनात येत नाही.

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करू नये. यामुळेच श्रद्धाच अंधश्रद्धेत कधी बदलते ते कळत नाही. यामुळे असे वाटते की, इतरांना दोष देण्यापेक्षा या सर्व गोष्टींना आपणच कारणीभूत आहोत हेच सत्य आहे. भगवतगीता आणि ज्ञानेश्वरी कर्म आणि योग्य आचरणासंबंधी सांगतात. श्रद्धा म्हणजे अंतरंग जागृत करणारी शक्ती आहे. सर्व संत हेच सांगतात. पूर्वी शिक्षण नव्हते. त्यामुळे अडाणी लोक अशा भोंदूबाबांच्या भूलथापांना बळी पडायचे. विज्ञान एवढे प्रगत नव्हते. परंतु आज विज्ञान एवढे पुढे गेलेले असतांनाही आपण यात का अडकतो याबद्दल आत्मपरीक्षण करण्याची खरी गरज आहे. समाज प्रगत व्हायचा असेल, तर अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीपासून दूर राहणे आवश्यक आहे. विज्ञाननिष्ठ विचार, जागरूकता आणि शिक्षण यांच्या मदतीनेच भोंदूगिरीचा प्रभाव कमी करता येईल. प्रत्येक व्यक्तीने स्वतः जागरूक राहून इतरांनाही जागरूक केले, तरच समाज खऱ्या अर्थाने प्रगत, सुजाण आणि सक्षम बनेल.

***













# अक्षय तृतीया, अन्नपूर्णा आणि परशुराम जयंती

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

अक्षय्य तृतीया तिथी प्रारंभ: १९ एप्रिल २०२६ सकाळी १०:४९ वाजता होत असून तृतीया तिथी समाप्ती : २० एप्रिल २०२६ सकाळी ७:२७ वाजता आहे. पूजा मुहूर्त: सकाळी १०:४९ ते दुपारी १२:२१ (कालावधी १ तास ३२ मिनिटे) सोने खरेदीसाठी शुभ वेळ: १९ एप्रिल सकाळी १०:४९ ते २० एप्रिल सकाळी ६:१४ पर्यंत आहे.

यंदा अक्षय्य तृतीया तिथी १९ ला नाही तर २० एप्रिलचा सूर्योदय पाहणार आहे, तसे असूनही १९ लाच अक्षय्य तृतीया साजरी केली जाईल.

कारण, हा सण दिवसाच्या पूर्वार्धात साजरा केला जातो, खरेदीसाठीही सकाळची वेळ योग्य मानली जाते.

अशातच तृतीया तिथी २० तारखेचा सूर्योदय पाहणार असली तरी अवघ्या काही मिनिटातच, म्हणजे ७.२६ मिनिटांनी ती संपणार आहे.

त्यामुळे मुख्य सण १९ ला साजरा केला जाईल. यालाच पूर्वाह्य व्यापिनी तथा पूर्वार्ध व्यापिनी तिथी असे म्हणतात.

वैशाख शु.तृतिया म्हणजेच ''अक्षय तृतिया''. जी साडेतीन शुभ मुहूर्त आपण मानतो, त्यातच अक्षय तृतिया हे एक पुर्ण मुहूर्त आहे. हिंदू धर्मातील पवित्र आणि महत्त्वाचा सण मानला जातो.

अक्षय म्हणजेच क्षय न होणारे, नाश न पावणारे. या दिवशी अन्नपूर्णा देवी जयंती, बसवेश्वर जयंती, नरनारायण या देवतेची जयंती, परशुराम जयंती, असते. या दिवशी महर्षी व्यासांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला प्रारंभ केला आणि त्यांचे लेखनिक म्हणून श्रीगणेशाने काम केले अशी आख्यायिका आहे.

हिंदू धर्मामध्ये भक्ती आणि अन्नाचा नैवेद्य दाखवणे याला खूप महत्त्व आहे. त्यामुळे देवी अन्नपूर्णा ही एक लोकप्रिय देवता मानली जाते. अन्नपूर्णा देवी ही पार्वतीचा अवतार आहे, असे मानले जाते. या देवीची अतिशय कमी मंदिरे आहेत. त्यातील एक महत्त्वाचे मंदिर म्हणजे वाराणसी येथील अन्नपूर्णा देवी मंदिर. अक्षय्य तृतीया हा दिवस अन्नपूर्णा देवीचा (वाढदिवस) जयंती दिवस मानला जात असल्यामुळे हा दिवस सोन्याचे दागिने खरेदी करण्यासाठी शुभ मानला जातो.

ह्या दिवशी दानाचेही अत्यंत महत्व आहे. अक्षय तृतियेच्या दिवशी केलेल्या दानाचेही अधिक पटीने पुण्य मिळत असते, ते चिरकाल टिकणारे असते म्हणून अनेक जण अक्षय तृतीयेस छत्री, पायातल्या वहाणा, पाण्यासाठी माठ, रांजण, पंचे, कापड, वस्त्र, आदींचे गरजू व्यक्तींना, वृध्दाश्रमात, गोरगरिबांचे वस्त्यात जाऊन दान करत असतात. जवस, गहू, हरभरा, दुग्धजन्य पदार्थ, जलकुंभ, सर्व प्रकारचे रस, आणि उन्हाळ्यात उपयुक्त अशा वस्तूचे दान करत असतात. यामुळे अनंत फलप्राप्ती होत असते. या तिथीला केलेले दान, हवन आणि पितरांना उद्देशून जे कर्म केले जाते ते सर्व अक्षय म्हणजे अविनाशी आहे.

ज्याला ज्या प्रमाणात शक्य असेल तेवढे त्यांनी जरूर करावे. सतपात्री दान करावे अशी भावना आहे.

या दिवशी भगवान विष्णू आणि लक्ष्मीची पूजा करतात. विधिवत पूजा केल्यास आपले मनोरथ पूर्ण होतात.

ह्या सुमारास उन्हाच प्रमाण वाढलेले असते, तापमान खूप असते. म्हणून अनेक व्यापारी मंडळी, संस्था, काही व्यक्ती रस्त्यावर पाणपोई सुरु करतात. जनावरांच्या पाण्यासाठी हौद, हाळ, बांधतात. ज्या ज्या पासून पुण्यप्राप्ती होईल ते ते करतात. कारण ते अक्षय आहे. अक्षय तृतियेला पितरांचे स्मरण करुन श्राध्द घालण्याचीही प्रथा आहे. या सणाचे निमित्ताने मनात पितरांची स्मृती




जागृत होते. त्यांचे आशिर्वाद घराला मिळतात. या दिवशी पवित्र नद्यांच्या संगमावर किंवा गंगा स्नानाचे महत्त्व आहे गंगास्नानने ती व्यक्ती पवित्र होते पापमुक्त होते असा समज आहे.

अक्षय तृतिया हे नाव पडण्यामागचे कारण ''मदनरत्न'' ह्या ग्रंथात श्रीकृष्णाने युधिष्ठनाला सांगितले आहे. श्रीकृष्ण म्हणतात,

''हे युधिष्ठिरा, या तिथीला केलेले दान, हवन, क्षयाला जात नाही.''

हा मुहूर्ताचाच दिवस असल्याने, सोने, चांदी, दागिने, मौल्यवान वस्तुंची खरेदी. अनेक शुभ कामांना प्रारंभ केला जातो. नवीन जागा व्यवसायचे उद्घाटन, नवीन वाहन खरेदी, नवीन संकल्प या दिवशी केले जातात. कोणतेही शुभ कार्य या दिवशी सुरू केल्यास ते कायमस्वरूपी टिकून राहते.

या दिवशी कृषिसंस्कृतीचा पालक म्हणून बलरामाची ही पूजा होते. शेतकरी शेतीच्या कामाला सुरूवात करतात. शेतकरी शेती कामासाठी नविन सालदाराची नेमणूक करत असत. आज ही प्रथा काहीच ग्रामीण भागात आढळून येते. काळा नुसार प्रथा बदलतात.

सध्या सर्वत्र पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने अशा परिस्थितीत ज्यांना ज्यांना शक्य आहे त्यांनी पाणपोई काढून पुण्य पदरी पाडावे, अशी स्थिती आहे.

ह्या काळात नामस्मरणालाही तेवढेच महत्व आहे. आपल्याला प्रिय असलेल्या देवतेचे होईल तेवढे नामस्मरण करावे. विष्णुसहस्त्रनाम, लक्ष्मीची उपासना, करावी.. ह्या दिवशी केलेल्या नामस्मरणाने घरातील दोष नाहीसे होतात.

आपल्याला आवडत्या देवतेचे नमस्मारण किंवा मंत्र पठण याने पुण्य अखंड टिकून राहते .

।। ओम नमो भगवते वासुदेवाय ।। किंवा

।। सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके

शरण्ये त्रंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।

हा जप आपण करू शकतो.

स्त्रियांनी घरात चैत्र गौरीची स्थापना केली असते. ह्या शेवटच्या दिवशी स्त्रिया हळदीकुंकवाचा कार्यक्रम करतात. गौरीला सांजोरी, करंजी, चकली, शेवेचा, नैवेद्यही दाखवतात. त्या निमित्ताने महिला एकत्र येतात. आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे, देतात. मोगऱ्याच्या फ ुलांचे गजरे देतात.

खान्देशात अक्षय तृतीया सण फार उतत्साहात साजरा होतो. खान्देश भागात ''आखाजी'' म्हणून हा सण ओळखला जातो. ग्रामीण भागात पत्याचे डाव रंगतात. जुगार खेळायला परवानगी असते जणू. तरुण, वयस्कर, सर्वच ह्यात सहभागी होतात. गल्लीत, देवळाच्या ओट्यावर, गोठयात, पारावर, जागोजागी डाव रंगलले दिसतात.


मुली माहेरवाशीण म्हणून आलेल्या असतात. त्यांच्यासाठी पुरणपोळी, आंब्याचा रस, कटाची आमटी, काही ठिकाणी मांडे ( म्हणजे खापरावर केलेल्या मोठ्या पुरण पोळ्या) हा बेत हमखास असतो.

अक्षय तृतीया दिवशी मुली माहेरी असतात. खानदेशात अनेक खेड्यामध्ये झाडाला झोके बांधलेले असतात आणि महिला एकत्र जमवून आखाजीची गाणीं म्हणत असतात. बालपणीच्या मैत्रीणींना भेटून आनंदाची उधळण करत असतात. तिथे वयाचा विचार नसतो.

अक्षय तृतियेला भगवान परशुरामची जयंती असते. भगवान विष्णूचा हा सहावा अवतार, आणि अष्टचिरंजीवा पैकी एक चिरंजीव अशी त्यांची महती आहे. त्यांचे पूजन केले जाते.अनेक ठिकाणी परशुरामाची मिरवणूक काढण्यात येते.आपल्या महाराष्ट्रात चिपळूण जवळ भगवान परशुरामाचे मंदिर आहे.

त्यांचे वडील सप्तर्षीपैकी एक ऋषी जमदग्नी आणि माता रेणुका. ब्राह्मणाचे तेज आणि क्षत्रियाचे शौर्य अशा दोन्ही गुणांचा संगम त्यांच्यात होता.

आम्ही आमच्या सद्गुरु माऊली समवेत सात- आठ दिवस ऋषिकेशला होतो त्यावेळी अक्षयतृतीयेला गंगा स्नान आणि स्वामी शिवानंद स्वामींचे आश्रमात महाप्रसाद घेतला होता. त्या अक्षय तृतीयेचा आनंद अवर्णनीय आहे...




या दिवशी--

अक्षय तृतीया दिवशी पवित्र नदीमध्ये तसेच गंगा स्नानाचे महत्त्व आहे.

ब्राह्मणाला भोजन देऊन वस्त्रदान तांदूळ, मीठ, फळे,छत्री, वाहाणा, दान करण्याचे महत्त्व आहे.

साडेतीन मुहूर्ता पैकी एक असल्याने या दिवशी सोने चांदी खरेदी नवे वस्त्र खरेदीचे महत्व आहे.वाहन खरेदी करतात.

पाण्याने भरलेली घागर वाळा टाकून ब्राह्मणास दान देतात तसेच या दिवसापासून अनेक लोक पानपोळी सुरू करतात.

शुभकार्य, संकल्पांची सुरुवात करतात.

भगवान परशुराम हे सप्तर्षीपैकी एक, तसेच जमदग्नीऋषी आणि रेणुका मातेची पुत्र. अक्षय तृतीयेच्या दिवशी भगवान परशुराम यांची जयंती हिंदू मोठ्या थाटामाटा सादर करतात.

या दिवशी पवित्र गंगा नदी स्नान केल्याने पापे नष्ट होतात अशी धरणा आहे.

अक्षय तृतीयेच्या दिवशी अन्नपूर्णा माता यांचा जयंती दिवस देखील मानला जातो. अन्नपूर्णा मातेची पूजा केली जाते. अन्नपूर्णा मातेचे पूजनाने स्वयंपाक घरात जेवणाची चव वाढते आणि घरात अन्नाची बरकत असते.कधीही कमी पडत नाही.

अनेक दृष्टीने अक्षय तृतियेचे महत्त्व आहे.सुख.समृद्धी. आनंद. देणारा सण आहे.

काळाच्या ओघात अनेक प्रथा परंपरा कमी होत असल्याचे जाणवते.

असे सणवार आपल्या संस्कृतीचा ठेवा आहे.त्याची जपणूक करणे आपले काम आहे. महाराष्ट्रा सह दक्षिण भारत, पश्चिम बंगाल, राजस्थान, या ठिकाणी अक्षय तृतीया सण साजरा केला जातो.


ह्या अक्षय तृतीयेच्या दिवशी आपण सर्व जण एक संकल्प करु. देवासमोर एक धान्याचा आणि दुसरा पाण्याने भरलेला असे कलश ठेउन सुख, समृद्धी साठी अक्षय वरदान मागू या. ह्या वर्षी अक्षय तृतिया १९ एप्रिल रविवार रोजी आहे. आपण सगळे सुख, समृध्दि, आरोग्य,या साठी, भगवान विष्णू, अन्नपूर्णा माता आणी लक्ष्मीदेवी कडे प्रार्थना करु या.

।। अन्नपूर्णे सदा पूर्णे शंङ्कर प्राणवल्लभे

ज्ञानवैराग्य सिध्यर्थं भिक्षां देही च पार्वती ।।


## कवितेच्या लाटावर...


कवितेच्या लाटावर...






















हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# जागर प्रतिभेचा... युवा मनाचा...






**ज्योतिर्मय साहित्य**

संतपरंपरेच्या तेजोमय स्मृतींनी नटलेल्या छत्रपती संभाजीनगर या क्रांतीभूमीत, स.भु.च्या प्रांगणात उभारलेल्या संत एकनाथ साहित्य नगरीत (दि. २०,२१,२२ फेब्रुवारी २०२६ ) अडीच दिवसांचा ''साहित्योत्सव जागर प्रतिभेचा युवा मनाचा'' हा मराठी साहित्य-विश्वातील अविस्मरणीय सोहळा दिमाखात संपन्न झाला. ज्यात महाराष्ट्रभरातून ३८० पूर्णवेळासाठी नोंदणीकृत युवा साहित्यिक आणि वेगवेगळ्या सत्रांसाठी येऊन गेलेले २५०-३०० साहित्यिक रसिक यांनी उपस्थिती दर्शवली. मराठवाड्याच्या मातीत ज्या क्रांतीच्या ठिणग्या पडल्या, ज्या विचारांनी काळालाच दिशा दिली, त्या विचारांच्या पाऊलखुणा जपणाऱ्या या भूमीत साहित्याचा असा मंगलमय सोहळा रंगला, यातच त्याचे औचित्य दडलेले होते.

मराठवाडा ही केवळ भौगोलिक ओळख नाही; ती संघर्षाची, समतेची, विचारजागृतीची क्रांतीभूमी आहे. त्या क्रांतीभूमीचे केंद्र छत्रपती संभाजीनगर... आणि त्या केंद्रबिंदूचे हृदय म्हणजे क्रांतीचौक ! या क्रांती-भूमीतील सर्व महामानवांना कृतज्ञ अभिवादन करून, या पवित्र स्थानी छत्रपती शिवरायांच्या साक्षीने साहित्योत्सवाचा शुभारंभ झाला तो ग्रंथ दिंडीने !

ही ग्रंथ-दिंडी म्हणजे केवळ ग्रंथांची मिरवणूक नव्हतीच... तर ती होती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताचे प्रतिबिंब ! तो होता इतिहासाशी आणि भविष्याशी केलेला एक साक्षात्कार... या प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, ज्येष्ठ साहित्यिक आंबेडकरी विचारवंत ऋषिकेश कांबळे, मंत्री महोदय अतुलजी सावे, मा. दिवाकरजी कुलकर्णी, मा. नरेंद्रजी पाठक, मा शशीकांतजी घासकडबी, मा नितीनजी केळकर, मा. बाळकृष्ण कवठेकर, मा. युवराज नळे, मा. उमेश काळे, मा. अनिरुद्ध नाईक, डॉ. योगिता होके पाटील, डॉ. अपर्णा पाटील, डॉ. हरी जमाले आदी मान्यवरांच्या करकमलाने महाराष्ट्राच्या वैचारिक, सांस्कृतिक प्रतिबिंबाचे प्रतीक ठरलेल्या ग्रंथांचे पूजन करण्यात आले, गाथासप्तशती, विवेकसिंधू, लीळाचरित्र, सकल संतगाथा, ज्ञानेश्वरी, ग्रामगीता, शेतकऱ्याचा आसूड, फकिरा आणि भारताचे संविधान... या ग्रंथांचे ! हे ग्रंथ-पूजन म्हणजे महाराष्ट्राच्या विचारपरंपरेचा, समतेच्या संघर्षाचा, सांस्कृतिक वैभवाचा आणि मानवतेच्या जागराचा गौरव होता. प्राकृत गाथांपासून ते आधुनिक समतेच्या संविधानापर्यंतचा हा प्रवास म्हणजे महाराष्ट्राच्या आत्म्याचे प्रतिबिंबच जणू ! ग्रंथदिंडीचे उद्घाटन करताना ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांनी ग्रंथ म्हणजे समाजमनाचे भरणपोषण करणारे महत्त्वाचे साधन आहे, त्यासाठी असे साहित्योत्सव होणे समाज-हिताचे आहे.







विशेष म्हणजे ज्यात मोठ्या संख्येने तरुणाई सहभागी होत आहे. अशी भावना व्यक्त केली. तर गाथासप्तशती ते भारतीय संविधान ही मौलिक ग्रंथसंपदा या ग्रंथ दिंडीमध्ये ठेवून आयोजकांनी आजच्या साहित्य विश्वातील सर्वसामावेशक भूमिका व्यक्त केली. ही ग्रंथदिंडी म्हणजे साहित्य विश्वातील सर्व प्रवाहांना सोबत घेऊन चालण्याचे प्रतिकात्मक रूप आहे. असे विचार ज्येष्ठ साहित्यिक, आंबेडकरी विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी व्यक्त केले. ग्रंथ-दिंडी ही केवळ एक मिरवणूक नसून ज्ञान, संस्कृती आणि परंपरेची सजीव, स्पंदनशील अभिव्यक्ती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची प्रेरणा, वारकरी संप्रदायाची अखंड भक्तिभावना आणि पारंपरिक वेशभूषेची मोहक झलक या सर्वांचा अद्भुत संगम या भव्य दिंडीत अनुभवायला मिळाला. वारकरी वेशात सजलेले विद्यार्थी, हातात ग्रंथ, ओठांवर अभंग आणि विणा-टाळ-मृदंगाच्या निनादात ''ज्ञानोबा-तुकाराम''चा गजर करत जेव्हा मार्गक्रमण करत होते, तेव्हा वातावरण भक्तिरसाने भारून गेले. पुरुषांचा धोतर-फेटा, स्त्रियांची नऊवारी साडी, गळ्यातील तुळशीमाळ या सर्वांनी जणू संतकालीन महाराष्ट्र वर्तमानात अवतरल्याचा भास निर्माण होतो; तर शिवरायांच्या वेशभूषेत सजलेले विद्यार्थी स्वराज्य, शौर्य आणि स्वाभिमानाचा संदेश ठळकपणे देतात. ही दिंडी समाजात वाचनसंस्कृती रुजवणारी आणि मूल्यांची जाणीव जागवणारी प्रभावी चळवळ ठरते. ''ग्रंथ हेच खरे मित्र'' हा संदेश जनमानसात खोलवर पोहोचवत ती तरुण पिढीला साहित्याशी जोडते, विचारांना दिशा देते. संतांची शिकवण, नैतिक मूल्ये आणि सामाजिक भान यांचा संगम या दिंडीतून सजीव होतो. सामूहिक सहभागातून एकात्मता, शिस्त आणि भक्तीभाव दृढ होतो, तर संस्कृतीची जपणूक आणि संवर्धनही घडते. त्यामुळे ग्रंथ दिंडी ही केवळ परंपरेचा भाग न राहता समाजप्रबोधनाचे सशक्त साधन ठरते. ज्ञानाची पताका उंचावणारी, संस्कृतीची ओळख जपणारी आणि प्रेरणेची ज्योत प्रज्वलित करणारी एक अद्वितीय परंपरा म्हणने ग्रंथ-दिंडी...

उद्घाटनाच्या सत्रात उद्घाटक मा. अभिरामजी भडकमकर यांनी मराठी साहित्याच्या मूळकंदालाच स्पर्ष केला. उद्घाटनाच्या भाषणात ते म्हणाले, रामायण आणि महाभारत हे भारतीय संस्कृतीचे शाश्वत मार्गदर्शक ग्रंथ आहेत. त्यांनी आदर्श कुटुंबाची संकल्पना दृढ केली नात्यांत प्रेम, त्याग, विश्वास आणि कर्तव्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. या महाकाव्यांनी व्यक्तीला जबाबदार नागरिक बनवण्याची प्रेरणा दिली. धर्म, न्याय आणि कर्तव्यपालन यांची जाणीव जागृत करून समाजहिताचा विचार करण्याची शिकवण दिली. सामाजिक सलोखा, समता आणि माणुसकी यांचे मूल्यही या ग्रंथांतूनच रुजले. सत्य, करुणा, संयम आणि परोपकार या नैतिक तत्त्वांची पायाभरणी त्यांनी पिढ्यान् पिढ्या केली. म्हणूनच हे ग्रंथ केवळ कथा नसून संस्कारांचे अधिष्ठान आणि समाजजीवनाला दिशा देणारे दीपस्तंभ ठरतात.

बरोबरच त्यांनी साहित्य, साहित्याची प्रेरणा, साहित्याची भाषा, सकस साहित्याचे निकष, साहित्याची बाराखडी आदी पैलूंवर सहज सुलभ शैलीत भाष्य करुन युवा साहित्यिकांची एक कार्यशाळाच घेतली. याप्रसंगी प्रसिद्ध कवी मा. देविदास फुलारी यांनी युवा साहित्यिकांसाठी मौलिक आणि प्रेरक विचार मांडले. उत्तम साहित्याची निर्मिती कशी कराल? या प्रश्नाची उकल करताना असा सूर निघाला की, साहित्याची निर्मिती ही केवळ शब्दरचना नसून ती संवेदनशील मन, सजग बुद्धी आणि मूल्यनिष्ठ दृष्टी यांचा समन्वय असतो. दर्जेदार साहित्य घडवण्यासाठी सर्वप्रथम सखोल आणि व्यापक वाचन आवश्यक आहे. संतपरंपरेतील संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या अध्यात्मसमृद्ध वाङ्मयापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रधान लेखनापर्यंत विविध प्रवाहांचे वाचन लेखकाची दृष्टी विस्तृत करते. वाचनामुळे भाषेची जाण विकसित होते, आशयाची खोली वाढते आणि अभिव्यक्तीला परिपक्वता प्राप्त होते. वाचन महत्त्वाचेच आहे, परंतु केवळ वाचन पुरेसे नाही; जीवनानुभवाची जाणीव आणि समाजातील घडामोडींविषयीची संवेदनशीलता आवश्यक असते. लेखकाने आपल्या आजूबाजूच्या वास्तवाचे बारकाईने निरीक्षण करावे. समाजातील वेदना, विषमता, आनंद, संघर्ष, परिवर्तन यांचे भान ठेवून त्यांना शब्दबद्ध केले, तर साहित्य अधिक जिवंत आणि प्रभावी बनते. सकस साहित्य वास्तवापासून दूर पळत नाही; ते वास्तवाशी प्रामाणिक राहते. तसेच, साहित्यामागे ठाम विचारसरणी आणि नैतिक अधिष्ठान असणे महत्त्वाचे आहे, अन्यायाविरुद्ध भूमिका, मानवतेचा आग्रह आणि सत्याची बांधिलकी ही साहित्याला दर्जा देणारी तत्त्वे आहेत. भाषा साधी, सुबोध आणि ओघवती असावी; अनावश्यक अलंकारांपेक्षा आशयाची स्पष्टता अधिक परिणामकारक ठरते. लेखनानंतर आत्मपरीक्षण, पुनर्लेखन आणि संपादन यांची शिस्त पाळली, तर शब्द अधिक परिष्कृत होतात.

शेवटी, उत्तम साहित्य घडवणे म्हणजे काळाशी संवाद साधत असताना सार्वकालिक मूल्यांची जपणूक करणे होय. वाचनाची खोली, अनुभवांची संवेदना, विचारांची स्पष्टता आणि भाषेची नेमकी अभिव्यक्ती यांचा संगम साधला, तरच साहित्य समाजाला दिशा देणारे आणि राष्ट्राला बळ देणारे ठरते. ही भावना या सत्रातून अभिव्यक्त झाली.

''राष्ट्र उभारणीत सकस साहित्याचे योगदान'' या विषयावर झालेल्या परिसंवादाने साहित्योत्सवाला वैचारिक अधिष्ठान दिले. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून राष्ट्रनिर्मितीचे सामर्थ्य आहे, संस्कारांची पेरणी आहे, मूल्यांची मशागत आहे. ही जाणीव प्रसिद्ध विचारवंत इंद्रजीतजी देशमुख यांनी श्रोत्यांना करून

**प्रा. सर्जेराव जिगे**
**निमंत्रक,**
**साहित्योत्सव - २०२६**
**९४२१३००८१०.**

दिली. मा. मुरहरी केळे, मा. प्रदीप ढवळ, मा. प्रणव पाटील यांनी ही जाणीव या चर्चेतून अधिक अधोरेखित केली.

उद्याच्या पिढीसाठी एक उत्तम जग निर्माण करण्यासाठी साहित्यिकांनी आपले लेखन केले पाहिजे. आपली तरुणाई ही देशाचे भविष्य असून या देशाच्या उज्वल भविष्यासाठी साठी तरुणाला सम्यक दिशा देण्याची जबाबदारी ही साहित्यिकांची आहे. साहित्यातून मूल्यांची रुजवणूक होऊन एक सुजाण सुसंस्कारित समृद्ध माणूस घडतो. साहित्यातून केवळ राष्ट्र विकासच नव्हे तर मानवतेचे संवर्धन झाले पाहिजे असे प्रतिपादन इंद्रजित देशमुख यांनी केले. स्वामी विवेकानंदांच्या साहित्यातील अनेक दाखले देत उपस्थित तरुणाईला मंत्रमूग्ध केले.

समाजाला केवळ मनोरंजन नव्हे, तर मार्गदर्शन करणारे साहित्यच राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी साधन बनते. नागरिक कर्तव्याची जाणीव जागवणारे विचार, कुटुंबसंस्थेला मूल्याधिष्ठित दिशा देणारे प्रबोधन, विविधतेतून एकतेचा संदेश देणारी सामाजिक जाणीव, निसर्गाशी सुसंवाद साधणारी पर्यावरण-जागर आणि स्वदेशीची आत्मनिर्भरता जोपासणारी वृत्ती या सर्वांचा संगम घडविणारे साहित्यच समाजमनाला घडवते. अशा साहित्यामुळे व्यक्ती सजग होते, कुटुंब सुदृढ होते, समाज सुसंवादी होतो आणि राष्ट्र बलवान बनते. म्हणूनच राष्ट्र उभारणीच्या व्यापक प्रक्रियेत मूल्यप्रधान, संस्कारक्षम आणि विचारप्रवर्तक साहित्याचे स्थान अत्यंत मोलाचे आहे, अशी सर्वमान्य भावना या चर्चासत्रातून स्पष्ट झाली.

राष्ट्र केवळ भौगोलिक सीमांनी घडत नाही; ते घडते विचारांनी, संस्कारांनी आणि मूल्यांनी. या विचारांचे, संस्कारांचे आणि मूल्यांचे बीजारोपण करणारे प्रभावी माध्यम म्हणजे सकस साहित्य. साहित्य समाजाचे आरसे आहे, पण ते केवळ प्रतिबिंब दाखवत नाही, ते समाजाला दिशा देते, जागवते, घडवते आणि घडवून आणते. राष्ट्र उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर साहित्याने आपल्या विचारांचे दीप प्रज्वलित ठेवले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील साहित्य याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. सकस साहित्य राष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचे जतन करते. संतपरंपरेतील संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांसारख्या संतकवींच्या वाङ्मयातून भक्ती, समता आणि मानवतेचा संदेश पिढ्यान-पिढ्या पोहोचला. त्यांच्या अभंग, ओवी आणि भारुडांद्वारा समाजातील तणाव, विषमता आणि अंधश्रद्धांवर प्रहार करत एकात्मतेची भावना दृढ केली. साहित्याने संस्कृतीचे संवर्धन केले आणि राष्ट्रभावनेला अधिष्ठान दिले. युवा पिढीच्या घडणीत साहित्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. चांगले साहित्य विचारांना धार देते, प्रश्न विचारण्याची वृत्ती निर्माण करते आणि विवेक जागवते. जेव्हा युवक उत्तम कादंबऱ्या, कविता, निबंध किंवा आत्मचरित्रे वाचतात, तेव्हा त्यांना जीवनाचे विविध पैलू समजतात. त्यातून सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि राष्ट्रप्रेमाची भावना अधिक बळकट होते. सकस साहित्य युवा मनात स्वप्ने रुजवते, पण त्या स्वप्नांना वास्तवाचे भानही देते.

राष्ट्र उभारणीसाठी केवळ आर्थिक प्रगती पुरेशी नसते; नैतिक अधिष्ठान आवश्यक असते. साहित्य हेच नैतिकतेचे भक्कम स्तंभ उभारते. ते अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला शिकवते, दुर्बलांच्या वेदनांना शब्द देते आणि परिवर्तनाची प्रेरणा देते. समाजातील विसंगतींवर भाष्य करताना साहित्य मार्गदर्शकाची भूमिकाही पार पाडते. त्यामुळे साहित्य म्हणजे समाजाचा प्राणवायू, जो राष्ट्राला जिवंत, सजग आणि संवेदनशील ठेवतो.

आजच्या डिजिटल युगातही सकस साहित्याची गरज तितकीच तीव्र आहे. माहितीच्या महासागरात विवेकाचे दिशादर्शक दीपस्तंभ म्हणजे दर्जेदार साहित्य. ते विचारांना स्थैर्य देते आणि मूल्यांना दृढ करते. म्हणूनच राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत साहित्याला केवळ पूरक नव्हे, तर मूलभूत स्थान आहे. शेवटी असे म्हणता येईल की, राष्ट्राची उंची त्याच्या इमारतींनी मोजली जात नाही; ती मोजली जाते त्याच्या विचारांनी. आणि हे विचार घडविण्याचे सामर्थ्य जर कोणाकडे असेल, तर ते सकस साहित्याकडेच आहे. राष्ट्राच्या प्रगतीच्या वाटेवर साहित्य हेच प्रेरणेचे, परिवर्तनाचे आणि नवचैतन्याचे अखंड स्रोत आहे. अंततः शब्दांच्या माध्यमातून समाजमन घडवता येते, विचारांना दिशा देता येते, ही जाणीव उपस्थितांच्या मनात रंजू घालू लागली हे या सत्राचे फलित आहे.

''२१व्या शतकातील स्त्री-साहित्यिकांची अभिव्यक्ती'' या विषयाने नव्या संवेदनांचा पट उलगडला. स्त्री लेखन हे आता केवळ वेदनांचे वर्णन नसून आत्मभानाचे, स्वातंत्र्याचे आणि परिवर्तनाचे घोषणापत्र बनले आहे, ही जाणीव सत्राध्यक्ष मा. माहेश्वरी गावित यांनी अधोरेखित केली. श्रीमती सुनिता सांगोले, श्रीमती रेखा ढेरे या स्त्री लेखिकांनी वर्तमानकालीन संदर्भ देत चर्चेत सहभाग घेतला. नव्या पिढीतील स्त्री लेखिका आपल्या लेखणीतून समाजाच्या बदलत्या वास्तवाला भिडत आहेत, हे या परिसंवादाने अधोरेखित केले.

एकविसावे शतक हे स्त्री-अभिव्यक्तीच्या नव्या उंबरठ्याचे शतक आहे. दीर्घकाळ दडपल्या गेलेल्या अनुभवांना, वेदनांना आणि स्वप्नांना आता निर्भीड शब्द लाभले आहेत. आजची स्त्री साहित्यिका केवळ भावविश्व रेखाटत नाही, तर ती आपल्या अस्तित्वाचा, अस्मितेचा आणि स्वातंत्र्याचा ठाम उच्चार करते.

पूर्वसुरींनी घातलेल्या पायावर उभे राहून आधुनिक लेखिका नव्या संवेदनांचा पट उलगडतात. पूर्वकालीन साहित्यातील सामाजिक जाणिवांपासून प्रेरणा घेत आजच्या लेखिका अधिक वैयक्तिक, अधिक स्पष्ट आणि अधिक प्रखर होताना दिसतात. स्त्री साहित्यिकांच्या लेखनात आता केवळ घरगुती भावविश्व नाही तर करिअर, राजकारण, स्त्री-पुरुष समानता, मानसिक आरोग्य, पर्यावरण, डिजिटल जग यांसारख्या विविध विषयांचा समावेश आहे.

२१व्या शतकातील स्त्री लेखिका ही केवळ शब्दांची कारागीर नसून काळाच्या स्पंदनांना जाणणारी आणि समाजमनाला दिशा देणारी सजग सर्जक आहे. तिच्या लेखनातून आदर्श कुटुंबाची संकल्पना नव्याने अर्थपूर्ण होते जिथे परस्पर सन्मान, संवाद आणि समतेची उब आहे. घर हे तिच्यासाठी केवळ नात्यांचे आवरण नसून मूल्यांची शाळा आहे. आईपणाच्या कोमलतेसोबत स्वाभिमानाची ताकद, जिव्हाळ्यासोबत विचारस्वातंत्र्य आणि परंपरेसोबत परिवर्तनाची जाणीव ती समर्थपणे मांडते. तिच्या साहित्यातील स्त्री पात्रे दुःखाची प्रतीके नसून निर्णयक्षम, स्वावलंबी आणि स्वप्नांना आकार देणारी असतात. तिची अभिव्यक्ती वैयक्तिक अनुभवांच्या पलीकडे जाऊन सामाजिक जाणिवांचे विस्तीर्ण आकाश व्यापते. अन्याय, विषमता, पर्यावरणीय प्रश्न आणि लोकशाही मूल्ये यांवर ती निर्भीडपणे भाष्य करते. सुजाण नागरिकत्वाची जाणीव दृढ करताना ती स्त्री-पुरुष समानतेचा स्वच्छ आणि समर्थ स्वर उमटवते. कोमल भावविश्वापासून ते सामाजिक भानापर्यंत आणि जागतिक स्तरावर निर्भीड मांडणीपर्यंतचा वारसा आजच्या लेखिकांच्या लेखणीत अधिक व्यापक झाला आहे. आजच्या स्त्री लेखिकेचे साहित्य राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी ठरून समाजमनाला जागृत आणि भविष्याला दिशा देणारे सशक्त माध्यम बनते.

एकविसाव्या शतकातील स्त्री साहित्यिकांची अभिव्यक्ती ही केवळ वैयक्तिक भावनांची मांडणी नाही; ती परिवर्तनाची घोषणा आहे. ती समानतेचा आग्रह धरते, स्वाभिमानाचा ध्वज फडकवते आणि मानवी मूल्यांना नवी दिशा देते. थोडक्यात, आजची स्त्री साहित्यिका केवळ लेखिका नाही, ती काळाची साक्षीदार, परिवर्तनाची वाहक आणि नव्या समाजरचनेची शिल्पकार आहे.

मा. सुशील कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या टॉक शो - समाज माध्यमावरची अभिव्यक्ती - या चर्चेत निकिता भागवत, विनोद जैतमहाल, स्वानंद गांगल ही मान्यवर मंडळी सहभागी झाली.

चर्चेतून सूर निघाला तो असा - एकविसाव्या शतकात समाज माध्यमांनी संवादाची आणि अभिव्यक्तीची व्याप्ती आमूलाग्र बदलून टाकली आहे. पूर्वी मत मांडण्यासाठी वृत्तपत्रे, मासिके, व्यासपीठे किंवा सार्वजनिक सभा यांचा आधार घ्यावा लागत असे; परंतु आज मोबाईलच्या एका स्पर्शाने प्रत्येक व्यक्ती आपले विचार जगासमोर मांडू शकते. त्यामुळे अभिव्यक्ती अधिक सुलभ, झपाट्याने आणि व्यापक झाली आहे. समाज माध्यमांवरील अभिव्यक्ती ही लोकशाहीचा विस्तार मानली जाते. सामान्य नागरिकालाही शासनव्यवस्था, सामाजिक प्रश्न, साहित्य, कला, शिक्षण, पर्यावरण अशा विविध विषयांवर आपले मत मांडण्याची संधी मिळते. अनेक सामाजिक चळवळी, जनजागृती मोहीमा आणि सकारात्मक उपक्रम समाज माध्यमांच्या माध्यमातून प्रभावीपणे उभे राहिले आहेत. युवा पिढीला आपली सर्जनशीलता व्यक्त करण्यासाठी हे प्रभावी व्यासपीठ ठरले आहे.

तथापि, या अभिव्यक्तीची दुसरी बाजूही आहे. बिनधास्तपणे, पडताळणी न करता माहिती प्रसारित केली जाते. अफवा, द्वेषपूर्ण भाषा, ट्रोलिंग आणि खोटी माहिती यांमुळे समाजात गैरसमज व तणाव निर्माण होऊ शकतो. 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स' मिळवण्याच्या स्पर्धेत काही जण जबाबदारी विसरतात. त्यामुळे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य जपत असताना विवेक, संयम आणि संवेदनशीलता यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

समाज माध्यमांवरील अभिव्यक्ती ही केवळ वैयक्तिक मतप्रदर्शन नसून ती समाजमन घडवणारी शक्ती आहे. प्रत्येक पोस्ट, प्रत्येक प्रतिक्रिया ही इतरांवर परिणाम घडवू शकते. म्हणूनच डिजिटल साक्षरता, कायदेशीर जाण आणि नैतिक मूल्ये यांचा आधार घेत अभिव्यक्ती करणे काळाची गरज आहे.

अंततः या चर्चेचा सूर निघाला तो असा की, समाज माध्यमे ही आधुनिक काळातील प्रभावी अभिव्यक्तीची साधने आहेत. ती परिवर्तनाची प्रेरणा देऊ शकतात, पण त्यासाठी स्वातंत्र्यासोबत जबाबदारीची जोड आवश्यक आहे...''मुक्त अभिव्यक्ती हवी, पण सजगतेच्या चौकटीत.''

वाचनाने आम्हाला काय दिले? या महत्त्वाच्या सत्रात पृथ्वीराज तौर यांच्या अध्यक्षतेखाली समीरा गुजर, मधुरा वेलनकर, मनोहर सिरसाठ ही मान्यवर मंडळी सहभागी झाली. या विषयावर झालेल्या चर्चेचे सारतत्व म्हणजे- वाचन ही केवळ अक्षरांची ओळख नसून ती व्यक्तिमत्त्व घडवणारी, विचारांना दिशा देणारी आणि आयुष्य समृद्ध करणारी प्रक्रिया आहे. पुस्तकांच्या सहवासात माणूस केवळ ज्ञान मिळवत नाही, तर तो स्वतःला नव्याने शोधू लागतो. त्यामुळे वाचनाने आम्हाला दिलेली देणगी अमूल्य आहे. प्रथम, वाचनाने आम्हाला ज्ञान दिले. विविध विषयांवरील पुस्तके वाचताना इतिहास, विज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान यांची ओळख होते. जगाचा विस्तृत पट आपल्या समोर उलगडतो. विशेषतः जे अनुभव आपण प्रत्यक्ष घेऊ शकत नाही, ते वाचनातून अनुभवता येतात. दुसरे म्हणजे, वाचनाने आम्हाला विचारशक्ती आणि विवेक दिला. चांगले साहित्य मनाला प्रश्न विचारायला शिकवते. योग्य-अयोग्य याचा विचार करण्याची क्षमता वाढवते. माणूस अधिक संवेदनशील, समंजस आणि सजग बनतो. तिसरे म्हणजे, वाचनाने आम्हाला भाषेची समृद्धी दिली. वाचनाने शब्दसंपदा वाढते, अभिव्यक्ती अधिक प्रभावी होते. विचार स्पष्टपणे मांडण्याची कला अवगत होते. त्यामुळे संवाद अधिक अर्थपूर्ण बनतो.

याशिवाय वाचनाने आम्हाला संस्कार आणि मूल्ये दिली. संत साहित्य, चरित्रे, प्रेरणादायी ग्रंथ यांमधून आदर्शांचे दर्शन घडते. जीवनातील संघर्षांना सामोरे जाण्याची प्रेरणा मिळते. संकटाच्या काळात पुस्तकांचा सहवास धीर देतो.आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, वाचनाने आम्हाला आत्मसंवाद दिला. एकांतात पुस्तक उघडले की आपण स्वतःशी बोलू लागतो. आपल्या भावना, विचार, स्वप्ने यांना दिशा मिळते. वाचन मनाला स्थैर्य आणि समाधान देते.

अंततः वाचनाने आम्हाला ज्ञान, विवेक, संस्कार, भाषिक समृद्धी आणि आत्मिक समाधान दिले.

खरेच, ''वाचन म्हणजे जीवन समृद्ध करणारा नित्यनवा प्रवास.'' या जाणिवा येथे अधोरेखित केल्या गेल्या.

हातात विश्व, मनात प्रश्न : आजचे युवा साहित्य कुठे चालले आहे?

प्रा. रवींद्र बेंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्रात मा. शशिकांत घासकडबी, विजय लोहारे, मारुती घुगे आणि प्रतीक्षा लोहकरे या मान्यवरांनी सहभाग नोंदवला. आजच्या युवा पिढीच्या हातात संपूर्ण विश्व सामावले आहे. एका क्लिकवर जग उघडते, माहितीचा महासागर उपलब्ध होतो, विचारांची देवाणघेवाण क्षणात होते. पण या अफाट विश्वाच्या मध्यभागी उभा असलेला तरुण मनोमन अनेक प्रश्नांनी घेरलेला आहे, आपली ओळख काय ? आपल्या मुळांचा अर्थ काय ? बदलत्या जगात आपली दिशा कोणती ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न म्हणजेच आजचे युवा साहित्य...

आजचे युवा साहित्य पारंपरिक चौकटी मोडून नवे विषय हाताळत आहे. अस्तित्व, अस्मिता, लैंगिकता, मानसिक ताण, बेरोजगारी, सामाजिक विषमता, पर्यावरण, तंत्रज्ञान या साऱ्यांवर तरुण लेखक निर्भीडपणे लिहित आहेत. त्यांच्या लेखनात बंड आहे, अस्वस्थता आहे, पण त्याचबरोबर बदलाची आसही आहे. हे साहित्य केवळ कल्पनारंजनात रमणारे नाही; ते वास्तवाच्या कठोर प्रश्नांना भिडणारे आहे.

***

# धप धप धपांडी

सायंकाळची वेळ होती. थंडी पडायला सुरुवात झाली होती. दिवाळीच्या सुट्ट्या संपत आल्या होत्या. मुलांना सुट्टी संपूच नये असे वाटत होते. पण त्यांचा नाईलाज होता. सुट्टी संपता संपता जेवढे खेळून घेता येईल तेवढे मुलं खेळत होती. या संध्याकाळी मुले वांगेटांगे, लपंडाव, लगोर असे खेळ खेळत होती. आज लपंडाव रंगला होता. अंधार लवकर पडायला लागला होता. त्यामुळे मुलांनी वांगेटांगे खेळून झाल्यावर लपंडाव सुरु केला.

खेळाच्या सुरुवातीला कोणावर राज्य येणार यासाठी तीन तीन जणांनी हात धरून उतरणे करु लागली. एक एक जण उतरु लागला. शेवटच्या वेळी एक जणावर राज्य आलं. या सर्व मुलात खट्याळ, चलाख, विनोदी असा समर्थ नावाचा मुलगा होता. त्याच्या बरोबर गल्लीतील मल्हार, आदित्य, अहिरुद्र, आर्यन, आरव, ओंकार, श्रीकांत, चार दोन छोट्या मुली आरोही, रेवा, निधी, राज्ञी, सानुली, मनाली या उगाच लुडबुड करणाऱ्या मुलीही खेळायला यायच्या. हात उतरुन झाल्यावर आरवने खेळाचे नियम सांगितले. खूप लांब लपायला जायचं नाही, मंदिराच्या व आपल्या गल्ली बाहेर जायचे नाही, कुणीही कोण कुठे लपले आहे हे सांगायचे नाही, बाटली फेकल्या फेकल्या सर्वांनी लपायचे, कुणीही चिडायचे नाही. चिडला की खेळातून काढून टाकायचे, कुणीही घरात जाऊन लपायचे नाही. नियम सांगून झाल्यावर प्रत्यक्ष खेळायला सुरुवात झाली. दोनतीन जणांनी लपलेल्या सर्वांना शोधून काढलं. समर्थ सारख्या खोडकर मुलाला सुध्दा दोन तीन वेळा धपांडी पडली. मला धपांडी घालून तुम्ही मला दमवता होय.आता तुमची मजाच करतो थांबा जरा. एवढं माझ्यावरच राज्य जाऊ दे मग बघा कशी गंमत करतो तुमची!!!

मग समर्थने शेवटी सगळ्यांना शोधून काढले. आरव धपांडी द्यायला पळत आला पण काही उपयोग झाला नाही. सगळ्यांना शोधून विष्टाप केले, आणि राज्य घेण्यातून आपली सुटका समर्थनं करून घेतली. आता बघा तुमची गंमत,आता मी तुम्हाला कुणाला सापडत नसतो असे म्हणून त्याने बाटली जोरात फेकली. आदित्य वर राज्य होते. बाटली फेकल्या फेकल्या सर्व जण लपण्यासाठी पळाले. परिसरातील झाडी,मंदिराचा परिसर, घराच्या कंपाऊंड, असे करत करत समर्थ आपल्या कंपाऊंड वरुन उडी मारुन घरी गेला.

आदित्यने सर्वांना शोधून काढलं. कुणीच धपांडी दिली नाही. पहिल्यांदाच अहिरुद्र सापडला होता. त्यामुळे तो ओरडत होता. माझे राज्य वाचवा रे.समर्थ माझे राज्य वाचव. गपचूप येऊन धपांडी दे.पण समर्थ आदित्यलाच काय कुणालाच सापडत नव्हता, दिसत नव्हता, कुठे लपला आहे हे माहित पण होईना!!

पण समर्थ तुमची गंमतच करतो म्हणून जी कंपाऊंड वरुन उडी मारुन घरी गेला होता. त्यामुळे कुणाला सापडण्याचा, दिसण्याचा प्रश्नच नव्हता.समर्थ मस्त पैकी दिवाळीच्या लाडवावर, चकलीवर, आणि चिवड्यावर ताव मारत बसला होता. दोन लाडू, दोन चकल्या खाऊन झाल्यावर पुन्हा कंपाऊंड वरुन उडी मारुन मंदिराच्या मागे जाऊन थांबला. अहिरुद्र ओरडतच होता समर्थ माझे राज्य वाचव रे म्हणून!! तेवढ्यात मागून येऊन समर्थने आदित्यला धपांडी दिली. अहिरुद्र तर राज्य टळल्यामुळे नाचूच लागला.

तेवढ्यात आरवची नजर समर्थच्या तोंडावर गेली. आरवला समर्थच्या तोंडाला बुंदीच्या लाडुची कळी लागली होती. हे दिसलं. तो ओरडला समर्थ घरी गेला होता. आपला नियम त्याने मोडला आहे. घरी जायचे नाही असे असून सुध्दा तो घरी गेला होता. समर्थने बरेच आढेवेढे घेतले पण कुणी त्याचे ऐकेनात. तो म्हणाला मी कशावरुन घरी गेलो म्हणताय?मी तर मंदिराच्या मागेच लपून बसलो होतो. आरव म्हणाला तुझ्या तोंडाला लाडूची कळी लागलीय तू घरी जाऊन लाडू चकली खाऊन आला आहेस. मल्हारने त्याच्या हाताचा वास घेतला तो पण म्हणाला होय त्याच्या हाताला वास येतो आहे. आपली फजिती झाली आहे हे त्याने ओळखले. बरं तुमचे खरं म्हणून तो थांबला. अहिरुद्र वर राज्य आलं आहे ना? अहिरुद्र म्हणाला मी का बरं राज्य घेऊ? तू नियम मोडला आहे. तूच राज्य घ्यायला पाहिजे. या अहिरुद्रच्या म्हणण्याला सगळ्यांनी पाठिंबा दिला. आता समर्थ जवळ काही राज्य घेण्या शिवाय पर्याय उरला नव्हता. तो राज्य घेण्यास गेला. चांगले आठ वाजे पर्यंत कुणीच त्याला सापडले नाहीत. सगळ्या परिसरात तो सगळ्यांना शोधत राहिला. पण एक जण ही सापडत नव्हते. शेवटी शोधून शोधून दमून गेला. सगळ्यांनी समर्थला चांगलाच धप धप धपांडा घातला होता. त्याला राज्य घ्यायला सांगून सगळे ठरल्याप्रमाणे आपापल्या घरी गेले होते. कुणी जेवण, कुणी गोष्टीचे वाचन, कुणी लाडू खात होते,कुणी दूरदर्शनवर मालिका पहात बसले होते. आणि समर्थ गल्लीत चकरा मारत बसला होता.



**– दत्ता तरलगट्टी सर**
मुक्त पत्रकार, पंढरपूर
९८८१६२९०४८

# जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे

(म्हणींच्या गोष्टी)

संपतशेठ नावाचा एक भाजीपाल्याचा व्यापारी होता. शहरातल्या बाजारपेठेत त्याचा मोठा दरारा असे. त्याचा एकच नियम होता – शेतकऱ्याकडून माल घेताना तो मातीमोलाने खरेदी करायचा. शेतकरी रडकुंडीला आला तरी संपतशेठचं मन पाझरत नसे. ''बाजारात मंदी आहे'' किंवा ''माल खराब आहे'' अशी नानाविध कारणं देऊन तो कवडीमोलाने माल विकत घेई.

एके दिवशी असाच एक वृद्ध शेतकरी वांग्यांच्या पाट्या घेऊन त्याच्याकडे आला. पावसाअभावी पीक आधीच कमी आलं होतं. संपतशेठनं त्या वांग्यांकडे पाहिलं आणि तुच्छतेने म्हणाला, ''काय हे? कसली ही वांगी? दोन रुपये किलोनं द्यायची असतील तर ठेव, नाहीतर घेऊन जा पुढच्या दुकानात.''

त्या म्हाताऱ्याच्या डोळ्यात पाणी आलं. तो केविलवाण्या स्वरात म्हणाला, ''मालक, खत-पाण्याला सुद्धा पैसे उरणार नाहीत, पाच रुपयानं तरी घ्या.'' पण संपतशेठनं त्याला पिटाळून लावलं. तो म्हातारा हताश होऊन आपला माल तिथेच सोडून निघून गेला.

काही महिन्यांनंतर संपतशेठच्या मुलाला शाळेत प्रकल्पासाठी शेती हा विषय मिळाला. मुलाने हट्ट धरला की त्याला प्रत्यक्ष शेतात जाऊन काम पाहायचं आहे. संपतशेठ मुलाला घेऊन आपल्या मित्राच्या शेतावर गेला. योगायोगाने तिथे मशागतीचं काम सुरू होतं.

दुपारचं कडक ऊन पडलं होतं. मुलाला आनंद वाटावा म्हणून संपतशेठनं स्वतः कुदळ हातात घेतली. अवघ्या अर्ध्या तासात जमीन खणताना त्याच्या हाताला फोड आले. घामाने अंग भिजलं आणि कमरेत सणक आली. माती आणि चिखल तुडवताना त्याला समजलं की एक रोप जिवंत ठेवण्यासाठी किती जीव लावावा लागतो.

सूर्य मावळल्यावर जेव्हा हताश होऊन तो तिथेच बसला, तेव्हा त्याला त्या वृद्ध शेतकऱ्याचा चेहरा डोळ्यासमोर दिसू लागला. त्याला जाणीव झाली की आपण ज्या मालाला कवडीमोलाने विकत घेतो, त्यामागे एखाद्या माणसाच्या रक्ताचं पाणी झालेलं असतं. वातानुकूलित केबिनमध्ये बसून किंमत ठरवणं खूप सोपं असतं, पण उन्हापावसात राबणं किती कठीण आहे हे त्याला आज समजलं होतं.

संपतशेठ आपल्या मित्राला म्हणाला, ''खरं आहे मित्रा, आजपर्यंत मी फक्त माझा नफा पाहिला, पण त्या शेतकऱ्याचे कष्ट कधीच पाहिले नाहीत. म्हणतात ना, जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.''

तात्पर्य – दुसऱ्याच्या कष्टाची आणि संघर्षाची खरी किंमत तेव्हाच कळते, जेव्हा आपण स्वतः त्या परिस्थितीतून जातो.

**– मंगेश दौंडकर (पुणे)**
मो.नं.९८९०६१९३५४

# तो कोण...?

काळीकुट्ट अमावस्येची अंधारी रात्र, आणि सो सो करत सुटलेला तुफान वारा, काळ्याकुट्ट मेघांनी आच्छादलेले आकाश तुफान खवळलेला समुद्र विजांच्या कडकडाटात चमकणारे ते फ ेसळलेले पाणी, वाहत्या पाण्यावर पडलेला त्या प्रकाशाचा कवडसा एका विरान बेटावर त्या कितीतरी वर्षे जुन्या दगडी पायऱ्या अन् गुहा सदृश्य अशी खोली. त्याहून पाठीमागे दिसणारा दीपस्तंभ आतल्या खोलीची एकंदर गुढ अशी कथा सांगत होता. बाजूला चिरा पडलेल्या त्या भिंती, समोर पूर्ण अंधारमय अशी चौकट अर्धे वाळलेले गवत अन् अर्धे हिरवे गवत. दगडी पायरीला लागून जाणारे ते पाणी तरी ते गवत वाळलेले आणि अर्धे हिरवे एवढ्या तुफान पावसाच्या रात्री सर्वत्र अंधार पण इथे इथे हा प्रकाश आणि दीपस्तंभात असणारा प्रकाश सारे कसे अनाकलनीय असेच वाटत होते .हा कोणता भ्रम आहे की वस्तुस्थिती याची जाणीव अंगावर शहारे आणणारी.

आणिअशाच तुफानी रात्री कुठूनही रस्ता नसताना त्या पायऱ्यांवरून चालणारी ती पाठमोरी आकृती काळा जर्किन पायजमा घातलेली. रात किड्यांच्या किरकिरीत घुमणारा तो वाळलेल्या गवताचा तो कुर.. कुर.. आवाज शांततेला भंग करीत होता. आतून पूर्ण अंधकार मय अशी ती खोली आणि बाहेरचा प्रकाश नव्या कुतुहलात मिटत होते. पुढे सरसावणारी ती पाऊले ती गवताची कुरकुर कानाला कर्कश करीत किती वेळ चालत होती. तरी एक एक पायरी जणू शंभर पायऱ्यांचा अंदाज होती की काय देव जाणे असे करता करता शेवटी शेवटची पायरी आली.

चौकटीसमोर तो जाताच विजांचा लखख प्रकाश पडला .चीर पडून दरवाजा उघडला गेला. तो आतमध्ये गेला आणि दीपस्तंभातील तो प्रकाशाचा रंग बदलला आणि निळसर छटा सोडू लागला. बाहेर असणारा तो बल्ब ही आपोआप बदलला. तांबड्या रंगाऐवजी निळ्या रंगाची ती प्रकाश छटा आणि त्या वाळलेल्या गवताचा तो बदलेला रंग हे काय होतेय. कुठे आहोत आपण आत गेल्यानंतर आतमध्ये असलेली ती लांब गुहा आणि तो मिणमिणता प्रकाश आणि झपझप चालणारी ती पाऊले आणि त्या पाठमोऱ्या आकृतीच्या पाठीमागे दबक्या पावलात चालणारी मी कुठेही एका क्षणाचा विलंब होता कामा नये.असे म्हणता म्हणता त्याच्या पाठीमागे चालली होती.तो पहात नाही याचा अंदाज घेत होते तो पुढे मी मागे आणि मागे पडणाऱ्या त्या सावट आतमध्ये असणारी ती भयाण शांतता त्याच्या पावलाबरोबर पाऊले उचलणारी मी त्याच्या मागोमाग चालले होतो. दगड मातीतून जाणारा तो नागमोडी रस्ता खूप दूरवर गेला होता. रात किड्यांच्या तो कर्ण कर्कश आवाज, कुठेही दिवा दिसत नव्हता तरीही तो मंद प्रकाश कुतुहल निर्माण करत होता. विचारांच्या तंद्रीत काही क्षणानंतर.. एक किंकाळी

पण ...

पण...

एका क्षणाच्या पाठलागानंतर त्याने मागे वळून पाहिले.आणि... आहे त्या जागेवर

आणि तोंडावर घट्ट हात ठेवून धाडकन जमिनीवर आदळले.. आणि.. आणि..

आई.. आई..! बाबा.. बाबा..!

मी... मी.... काही नाही केले. मी काही नाही केले.

करत करत अंगावर घेतलेल्या शालीचा अगदी चोळामोळा झाला.

बाबांनी तोंडावरचे अंथरुण काढत अगं मी आहे इथे डोळे उघड. माझ्या राजा डोळे उघड मी आहे इथे..! असे करता करता घट्ट मिटलेले डोळे मी उघडले . समोर दिसणारा पंखा आणि गार हवा कोरड्या सुकलेल्या घशाच्या आत जाऊन थंडावा देत होती.आणि मग अंगाला दरुन सुटलेला घाम पुसता पुसता हसून हसून पुरेवाट झाली.

आणि एवढ्यात बाबा मला जवळ घेऊन पण वैशु मला सांगशील का ग तो.. तो... कोण होता ग..!

बाबा..

क्रमशः



**– सौ. वैशाली महाडिक सातारा.**
मो. –९७६७४३७९२३

# आणि पुन्हा एकदा

में महिन्यातील संध्याकाळ वेळ – पाच साडे पाचची

स्थळ – गावातील पारावर विराज, अधिराज, सर्वेश बसलेले असतात. (दहा बारा वयातील मुले ) तिकडून गणेश येता येता..

गणेश : काय रे मित्रांनो, इथ बसलात.

विराज: हो रे मित्रा, काय हा उकाडा, त्यात लाईट गेली की अजूनच गरम होतेय रे.

अधिराज माझे आजी आजोबा म्हणतायत की में महिना संपत आला तरी अजून एकही उन्हाळी पाऊस पडला नाही. पाऊस पडले की शांतता होईल म्हणून.

नुसती तगमग होत आहे रे.

गणेश : याला आपण सगळेच जबाबदार आहोत.

विराज : ते कसे काय रे.

अधीराज : बरोबर आहे गणेश चे आपण वृत्त पत्रात वाचतो. बातम्या पाहतो.आपले शिक्षक ही आपल्याला सांगत असतात. तेव्हा आपण त्याकडे गांभीर्याने लक्ष देत नाही.पण कधी बारकाईने पाहिले तर किती वेळा वृक्ष तोडीमुळे हे असे झाले वगैरे वगैरे.

आपण कोणत्या कोणत्या कारणाने वृक्ष तोड केल्याचेच हे दुष्परिणाम आहेत.

सर्वेश: अरे पण ! वाळलेल्या झाडाचे ठेवून तरी काय उपयोग होणार आहे.

विराज : आणि आपले कोण ऐकणार अरे,

गणेश : हो ते ही बरोबर आहे तुझे. पण जर विचार केला तर वाळलेले झाड तोडले तरी त्या जागेवर त्या झाडाऐवजी आपण दुसरे झाड तर लावूच शकतो ना. आपण त्या जागेवर दुसरे झाड लावू या ना! आणि त्याचे संगोपन करूया. आपण खेळा खेळातून त्याची काळजी घेऊया.

गणेश : माझी आई ही हेच सांगत असते.


आधिराज : बरोबर आहे, इथ बसून राहण्यापेक्षा आपण खेळ अभ्यास हे करता करता आपला मोकळा वेळ सत्कारणी लावू या. लवकरच पावसाळ्याचे दिवस सुरू होतायत.

कोणाच्या तरी घराच्या मोठ्या माणसाला विचारून त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्याचा प्रयत्न करुया.

गणेश : विराज म्हणतो तसे आपले कोणी नाही ऐकले तरी आपण करत राहिले पाहिजे. काही न करता काही तरी केलेले केंव्हाही चांगलेच की. आपण ठाम निश्चय करायचा. एकमेकांच्या मदतीने काहीतरी चांगले करुया.बघू, सगळ्याची नाही भेटली तरी काही लोकांची तर नक्कीच साथ भेटेल.आणि तेही नाही झाले तर काहीतरी चांगले केल्याचे समाधान तर नक्की भेटेल.

सर्वेश: बरोबर आहे गणेश चे ते काय म्हणतात र शुभस्य शिघ्रम, चला र मग, करायची का र सुरवात !

आधिराज : ठेवा र मग एकावर एक हात.



**–सौ. वैशाली महाडिक.**
९७६७४३७९२३







